दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१६९ | बुधवार, दि.१५ ऑक्टोबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# कर्जमाफीशिवाय मागे हटणार नाही!

## २८ ऑक्टोबरला राज्यातील शेतकऱ्यांचा नागपूरात मोर्चा, बच्चू कडूंचा एल्गार

अमरावती । प्रतिनिधी

**राज्यातील शेतकऱ्यांची कर्जमाफी, पिकांना हमीभाव तसेच दिव्यांग, मेंढपाळ आणि मच्छीमारांच्या विविध मागण्यांसाठी २८ ऑक्टोबर रोजी राज्यभरातील लाखो शेतकरी आणि मजूर नागपुरात मोर्चा घेऊन येणार आत. तसेच, मागण्या पूर्ण होईपर्यंत हे आंदोलन थांबवले जाणार नाही, असा इशारा मंगळवारी (दि.१४) प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांनी दिला.**



बच्चू कडू यांनी भाजपवर जोरदार टीका करत म्हटले, आम्ही विषारी नाग आहोत. जोपर्यंत सरकारने कर्जमाफी, हमीभाव तसेच दिव्यांग, मेंढपाळ आणि मच्छीमारांसंबंधी मुद्द्यांवर निर्णय घेत नाही, तोपर्यंत आम्ही मागे हटणार नाही. पुढे कडू म्हणाले की, काहीही झाले तरी पंजाबमधील आंदोलनाच्या ताकदीसारखेच हे आंदोलन करण्याची आमची मानसिकता आहे. या दिवशी राज्यभरातील लाखो शेतकरी आणि मजूर नागपुरात एकत्र येऊन मोर्चा काढणार आहोत. मुख्यमंत्री ज्या नागपूरातून येतात, तिथेच आम्ही संपूर्ण कर्जमाफीसाठी लढा उभारणार आहोत, असेही त्यांनी सांगितले. या आंदोलनाचा उद्देश सरकारला शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्यास आणि सर्व मागण्या मान्य करण्यास बांधील करणे हा असल्याचे त्यांनी सांगितले. त्यासाठी कडू यांनी शेतकऱ्यांना जात, पात, धर्म आणि पक्षभेद विसरून शेतकरी म्हणून एकत्र येण्याचे आवाहन केले. हा दिवस फक्त तारीख नाही, ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### हिजाब नाकारणाऱ्या शाळेस कोर्टाकडून पोलिस संरक्षण

एर्नाकुलमः मुस्लिम विद्यार्थिनीला हिजाब घालण्यास परवानगी देण्यास शाळेने नकार दिल्याच्या निषेधानंतर, केरळ उच्च न्यायालयाने एर्नाकुलम जिल्ह्यातील संबंधित शाळेला पोलिस संरक्षण देण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणी सेंट रीटा पब्लिक स्कूलच्या व्यवस्थापनाने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सेंट रीटा पब्लिक स्कूलच्या व्यवस्थापनाने दाखल केलेल्या याचिकेत नमूद केले होते की, आमची शाळा ख्रिश्चन प्रतिष्ठानाद्वारे व्यवस्थापित केली जात असली, तरी १९९८ मध्ये स्थापनेपासून ती पूर्णतः धर्मनिरपेक्ष पद्धतीने कार्यरत आहे. सोमवार, १३ ऑक्टोबर रोजी या प्रकरणाची उच्च न्यायालयाने तातडीने दखल घेतली. न्यायमूर्ती एन. नागरेश यांच्या एकल खंडपीठाने तात्काळ शाळेला पोलिस संरक्षण देण्याचा आदेश दिला. आता या प्रकरणी पुढील सुनावणी १० नोव्हेंबर रोजी होणार आहे.

### यंदा ठाकरे बंधूंची दिवाळी एकत्र

मुंबईः महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या (मनसे) वतीने शिवाजी पार्कवर आयोजित करण्यात आलेल्या दीपोत्सव कार्यक्रमाच्या निमित्ताने ठाकरे बंधू पुन्हा एकदा एकत्र येत आहेत. मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे येत्या शुक्रवारी, १७ तारखेला एकाच मंचावर दिसणार आहेत. मनसेच्या दीपोत्सवाचे उद्घाटन उद्धव ठाकरे यांच्या हस्ते होणार आहे. राज ठाकरे यांच्यासाठी हा क्षण विशेष आहे, कारण पहिल्यांदाच उद्धव ठाकरे हे मनसेच्या दीपोत्सव कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. यामुळे राजकीय वर्तुळात अनेक चर्चांना उधाण आले आहे.

### कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांचा पगार रखडला

पुणे : राज्यातील आरोग्य सेवेत काम करणाऱ्या राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत असलेल्या सुमारे ३२ हजार कंत्राटी कर्मचाऱ्यांवर सध्या उपासमारीची वेळ आली आहे. त्यांचे ऑगस्ट आणि सप्टेंबर या दोन महिन्यांचे वेतन थकले आहे. दिवाळी तोंडावर असताना वेतन न मिळाल्याने हे कर्मचारी दिवाळी कशी साजरी करणार? असा संतप्त सवाल विचारत आहेत. विविध मागण्यांसाठी एनएचएम कर्मचारी गेल्याच महिन्यात बेमुदत संपावर गेले होते. यावेळी राज्य सरकारने त्यांच्या १३ पैकी १० मागण्यांना तत्वत: मान्यता दिली होती. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी लेखी आश्वासन दिले होते. याला आता महिना उलटून गेला आहे. परंतू, या एनएचएम कर्मचाऱ्यांच्या खात्यात पगाराचे पैसे काही आलेले नाहीत. ती १० टक्के पगारवाढ राहुद्या, मूळ पगार तरी द्या, असे म्हणायची वेळ या कर्मचाऱ्यांवर आली आहे.

## डीएनए म्हणणाऱ्यांना आता कळेल
## ओबीसी-ओबीसीलाचा मतदान करणार-प्रा.हाके



जालना । प्रतिनिधी

जीआर रद्द करण्यासाठीओबीसी भटके विमुक्त महासंघाच्या परतुर मध्ये मोर्चा काढण्यात आला होता. २ सप्टेंबर २०२५ च्या मराठा समाजाला ओबीसी आरक्षण देण्याच्या निषेधार्थ शासनाच्या विरोधात परतुर येथे भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राध्यापक लक्ष्मण हाके सर बोलत होते. परतुर येथे रेल्वे स्टेशन पासून ते तहसील कार्यालय पर्यंत या मोर्चाचे आयोजन करण्यात ▶▶ पान २ वर

## कुणबी प्रमाणपत्र दिल्याशिवाय नोकर भरती करू नका !

### जरांगे पाटलांचा सरकारला इशारा; आता शेतकऱ्यांसाठी मोठे आंदोलन उभारणार





धाराशिव । प्रतिनिधी

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आता शेतकऱ्यांसाठी न भुतो न भविष्यती आंदोलन उभारण्याची गरज व्यक्त केली आहे. तसेच, शेती नुकसानीच्या पंचनाम्यामुळे कुणबी प्रमाणपत्र वाटपासाठी सरकारला १५ दिवसांचा वेळ जरांगे पाटलांकडून देण्यात आला आहे. मात्र, कुणबी प्रमाणपत्र वितरीत झाल्याशिवाय कोणतीही नोकर भरती घेऊ नका, असेही जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.


धाराशिव जिल्ह्याच्या कळंब तालुक्यातील ▶▶ पान २ वर

#### शेतकऱ्यांसाठी मुंडक्यावर पाय द्यावा लागेल

मनोज जरांगे पाटील आता मराठा आरक्षणनंतर शेती प्रश्नावर लढा उभारणार आहेत. शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी दिवाळी झाल्यावर राज्यव्यापी बैठक घेऊन आंदोलन उभारणार असल्याची घोषणा पाटील यांनी केली. असे आंदोलन उभा करावे लागेल की इथून पुढे अन् इथून मागे १०० वर्षात अे आंदोलन कोणी केल नसेल, तेव्हाच शेतकऱ्याच्या मागण्या मान्य करु घ्याव्या लागतील. मुंडक्यावरच पाय द्यावा लागेल, नुसते वावरात फिरल्याने, भाषण केल्याने, चिखलात फिरल्याने शेतकऱ्यांचा उद्ध्वस्त झालेला संसार भरुन निघणार नाही. शेतकऱ्याच्या पिकाला चांगला भाव द्यायचा असेल, कर्जमुक्ती करायची असेल, नुकसानीची शंकर टक्के भरपाई द्यायची असेल तर ताकतीने आंदोलन लावून धरावे लागणार आहे, त्यासाठी मी प्रयत्न करतोय, असेही पाटील यांनी म्हटले.

## शिवबा-तुकोबा यांचा अवमान ; धर्मांतरासाठी कैद्यांचा छळ

### बीडच्या हिंदू जन आक्रोश मोर्चामध्ये आ.पडळकर यांचे गंभीर आरोप




बीड । प्रतिनिधी

हिंदू – मुसलमान असा वाद लावत असल्याचा आरोप विरोधी पक्षाकडून होत आहे. असे काहीही नाही पण धर्मांतराच्या नावाखाली जो छळ होत आहे त्यावर आवाज उठवायचा की नाही हा प्रश्न आहे. बीडच्या कारागृह अधीक्षकाने परिसरात लावलेले छत्रपती शिवाजी महाराज, संत तुकाराम महाराज, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटो हलवले आणि काही कैद्यांना धर्म परिवर्तन करण्यासाठी दबाव आणि आमिष दाखवले. अशा अधिकाऱ्याला घरचा रस्ता दाखवला पाहिजे, असा इशारा आमदार पडळकर यांनी येथील हिंदू जन आक्रोश मोर्चामध्ये दिला.

बीड शहरातील सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स परिसरात ▶▶ पान २ वर

## कॉ.पानसरे हत्याप्रकरणातील सर्वच आरोपींची सुटका

कोल्हापूर । प्रतिनिधी

कोल्हापूर येथील कॉम्रेड गोविंद पानसरे हत्या प्रकरणासंदर्भात मोठी बातमी समोर आली आहे. यातील संशयित डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, अमोल काळे आणि शरद कळसकर यांना कोल्हापूर येथील मुंबई उच्च न्यायालयाच्या सर्किट बेंचकडून जामीन मंजूर झाला आहे. कॉम्रेड गोविंद पानसरे हत्या प्रकरणी आजपर्यंत एकूण १२ संशयित आरोपींना अटक करण्यात आली होती. त्यापैकी ९ जणांना यापूर्वीच जामीन मंजूर झाला होता.

मात्र, या प्रकरणातील डॉ. वीरेंद्र तावडे, अमोल काळे आणि शरद कळसकर या तिघांना जामीन मंजूर झाला नव्हता. ▶▶ पान २ वर

## संतप्त शेतकऱ्यांची बसेसवर दगडफेक

बीड । प्रतिनिधी

**कोरडेवाडी येथील साठवण तलावाचा प्रश्न मार्गी लावण्यात यावा या मागणीसाठी चार ते पाच गावकऱ्यांनी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात रस्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनामुळे काही वेळ वाहतूक ठप्प झाली होती. दरम्यान आंदोलनकर्त्यांची प्रशासन दखल घेत नसल्याने संतप्त शेतकऱ्यांनी पाच बसेसवर दगडफेक केली. यामध्ये एक बसचालक जखमी झाला आहे.**

कोरडेवाडीचा साठवण तलाव झाल्यानंतर तीन ते चार गावांचा पाणीप्रश्न मिटू शकतो. गावकऱ्यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागते. यापूर्वी अनेक वेळा प्रशासनाकडे तलावासंदर्भात निवेदन देण्यात आले मात्र याची दखल घेतली गेली नसल्याने आज गावकऱ्यांनी रस्त्यावर उतरून रस्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनामुळे काही वेळ वाहतूक ठप्प झाली होती. पाणी आमच्या हक्काचं, नाही कुणाच्या बापाचं! या सह इतर घोषणांचे फलक घेऊन कोरडेवाडीसह परिसरातील गावकरी रस्त्यावर उतरले होते. गावकऱ्यांच्या घोषणांनी अवघा परिसर दणाणून गेला होता. दरम्यान ▶▶ पान २ वर

## नगरपालिका मतदार यादीवर हरकतीसाठी मुदतवाढ

बीड । प्रतिनिधी

**सर्वत्र सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे वारे जोरात वाहत आहे. नगरपालिका, जिल्हा परिषद यांच्या प्रभाग रचना होऊन प्रभागाचे, गटाचे आरक्षणही काल घोषीत करण्यात आले.**

काल सायंकाळी निवडणूक आयोगाने नगरपालिका मतदार यादीवर आक्षेप घेण्याची मुदत संपलेली असताना त्यात वाढ करत १७ ऑक्टोबरपर्यंत यावर हरकती नोंद करता येणार आहेत. प्रभाग रचनेमध्ये अनेक मतदारांची नावे या प्रभागातून त्या प्रभागात गेलेली आहेत. यावर राजकारणाचा अभ्यास असणाऱ्या अनेक लोकांनी आक्षेप नोंदवले आहेत. मात्र या मतदारांची नावे शेकड्यात असण्याऐवजी हजारोंच्या संख्येने एका प्रभागातील ▶▶ पान २ वर

## ५० टक्के पेक्षा जास्त आदिवासी असलेल्या गावांचा पेसामध्ये समावेश करा-अजित पवार

मुंबई । प्रतिनिधी


राज्यातील सुमारे १७ हजार गावे सामुदायिक वनहक्कासाठी पात्र असून, आतापर्यंत केवळ ५ हजार गावांना हे हक्क देण्यात आले आहेत. उर्वरित पात्र गावांना सामुदायिक वनहक्क मिळण्यासाठी आदिवासी विकास विभागासह संबंधित यंत्रणांनी प्राधान्याने कार्यवाही करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी (दि.१४) दिले. मंत्रालयातील समिती कक्षात वनहक्क कायदा २००६ च्या प्रभावी अंमलबजावणी आणि जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी विषयक प्रश्नांबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला आदिवासी ▶▶ पान २ वर



## खड्ड्यांमुळे मृत्यू झाल्यास द्यावी लागणार ६ लाख भरपाई

### ठेकेदार आणि अधिकारी थेट जबाबदार, हायकोर्टाचा निर्णय





मुंबई । प्रतिनिधी

**खराब रस्ते किंवा खड्ड्यांमुळे कोणाचा मृत्यू झाल्यास, त्याला रस्त्यांचे बांधकाम करणारा ठेकेदार आणि स्थानिक नागरी संस्था जबाबदार असेल. तसेच खड्ड्यांमुळे मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबाला ६ लाख तर जखमी झालेल्या व्यक्तीला ५० हजार ते २.५० लाख रुपयांपर्यंत नुकसानभरपाई द्यावी लागेल, असा आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे.**

न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे आणि न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला. ▶▶ पान २ वर

#### » न्यायालयाने स्वत:हून दाखल केली होती जनहित याचिका

तत्कालीन न्यायमूर्ती जी. एस. पटेल यांनी २०१३ मध्ये मुंबईतील रस्त्यांच्या दयनीय स्थितीवर प्रकाश टाकणारे पत्र लिहिल्यानंतर न्यायालयाने स्वत:हून दाखल करून घेतलेल्या एका जनहित याचिकेवर हा निर्णय आला आहे. एका दशकाहून अधिक काळानंतर, न्यायालयाने नमूद केले की ''२०१५ पासून वारंवार न्यायालयीन हस्तक्षेप होऊनही,'' हेच प्रश्न प्रत्येक पावसाळ्यात पुन्हा दिसतात, ज्यामुळे सार्वजनिक प्राधिकरणांचा निष्काळजीपणा दिसून येतो.

## आता जि.प.साठी ५ तर पं.स.वर २ स्विकृत सदस्य!



मुंबई । प्रतिनिधी

**महानगरपालिका आणि नगरपालिकांमध्ये स्वीकृत सदस्य नेमले जातात. आता जिल्हा परिषदेत ५ आणि पंचायत समितीमध्ये २ सदस्यांची स्वीकृत सदस्य म्हणून नेमणूक करण्यासाठी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियमात सुधारणा करावी,**

### प्रामाणिक कार्यकर्त्यांना न्याय मिळणार, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**अशी विनंती करणारे पत्र महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मंगळवारी (दि. १४) दिले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या विषयावर सकारात्मक प्रतिसाद देत ग्रामविकास विभागाला कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.**

या सुधारणेनंतर ग्रामविकासात्मक प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी समाजाभिमुख कार्यकर्त्याला मिळेल, असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे. ग्रामीण स्तरावर सक्रियपणे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना योग्य प्रतिनधीत्व आणि संधी मिळावी या दृष्टीकोनातून, महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियमामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. सदर अधिनियमातील तरतुदींनुसार स्वीकृत सदस्यांची नियुक्ती करता ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**
बीड, दि.१३ ऑक्टोबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६०.०० क्विंटल | २,१५० | २,६८० | २,४४१ |
| ज्वारी/हायब्रिड: ६४.५० क्विंटल | २,००० | ३,३०० | २,३९१ |
| मका/लोकल: ७.५० क्विंटल | २,२५० | २,२५० | २,२५० |
| तूर : १.५० क्विंटल | ६,१२५ | ६,१२५ | ६,१२५ |
| उडीद : १५.५० क्विंटल | ४,६०० | ५,२५० | ५,०६२ |
| बाजरी: १२९.०० क्विंटल | २,२०० | २,७५० | २,४९४ |
| मुग: ७.०० क्विंटल | २,५०० | ४,५०० | ३,४८० |
| सोयाबीन: ७६६.५० क्विंटल | ३,००१ | ४,००० | ३,७८५ |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ४,३०० | ४,३०० | ४,३०० |

## अग्रलेख

# महाविकास आघाडीत चौथ्या भिडूची चर्चा

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी युती आणि आघाड्यांच्या चर्चांना आता सुरूवात झाली आहे. लोकसभा आणि विधानसभा महाविकास आघाडी म्हणून एकत्र लढणाऱ्या शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि काँग्रेस या तीन पक्षात राज ठाकरे यांचा मनसे हा पक्ष सहभागी होणार की नाही यावऊन आता महाविकास आघाडीतील चर्चांना सुरूवात झाली आहे. एकीकडे ठाकरे बंधू एकत्र येतात, एकत्र येताना केवळ मराठी भाषा हा एकमेव अजेंडा या अटीवर आपण एकत्र आल्याचे सांगतात. मात्र आता याच ठाकरे बंधूंच्या गाठीभेटी वाढत असल्या तरी दोघांकडूनही अद्याप शिवसेना आणि मनसे युतीबाबत कोणतीच घोषणा होत नाही. त्यात आता मनसेच्या रूपाने नव्या भिडूची भर या आघाडीत पडणार का? की प्रादेशिक पक्षांच्या महाराष्ट्र विकास आघाडीतून काँग्रेस बाहेर पडणार हे बघणे महत्त्वाचे ठरणार आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी सर्व राजकीय पक्षांकडून जोरदार तयारी केली जात आहे. गेल्या काही दिवसांपासून मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची आगामी निवडणुकीत राजकीय युती होणार असल्याचे बोलले जात आहे. ठाकरे बंधू एकत्र येतील मात्र महाविकास आघाडीचा भाग होणार असतील तर, त्याला महाविकास आघाडीतील घटक पक्षांचा पाठिंबा मिळणार का? यावर महाविकास आघाडीतील घटकपक्षांबरोबरच महायुतीतील शिवसेना शिंदेगट आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे देखील राजकीय समीकरण अप्रत्यक्ष अवलंबून असणार आहे. काँग्रेस हा महाविकास आघाडीतील एकमेव राष्ट्रीय पक्ष, इतर दोन पक्ष शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्ष हे प्रादेशिक पक्ष, काँग्रेसला सोबत घेऊनच निवडणुका लढविण्याची आणि महाविकास आघाडीत येण्याची मनसे प्रमुख राज ठाकरे यांची इच्छा असल्याचा दावा शिवसेना नेते संजय राऊत यांनी केला. तर यापूर्वीच काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मनसेला महाविकास आघाडीत स्थान नसल्याचा उच्चार केला होता. महाविकास आघाडीत आधीच तीन घटक पक्ष आहेत. त्यात चौथ्या भिडूची गरज नाही, असे वक्तव्य हर्षवर्धन सपकाळ यांनी केले होते. मनसे संदर्भातला अंतिम निर्णय दिल्लीतले नेते घेतील असे सांगून सपकाळ यांनी सावध पवित्राही घेतला होता.

महाविकास आघाडीला लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात चांगले यश मिळाले, ४८ पैकी जवळपास ३१ जागांवर आघाडीला यश मिळाले. यात सर्वाधिक काँग्रेसला १३ जागांवर यश मिळाले, त्यामुळे मरगळ आलेल्या आघाडीला राज्यात सत्ता येण्याचे वेध लागले. त्यात लोकसभा निकालानंतर मुठभर मांस वाढलेल्या आघाडीतील सगळ्याच पक्षांमध्ये, विधानसभा निवडणूकीपूर्वीच महाविकास आघाडीचा मुख्यमंत्री पदाचा चेहरा कोण यावऊनच वादाची ठिणगी पडली. त्यामुळे काही वेळा आघाडीत बिघाडी झाल्याचा संदेश लोकांपर्यंत गेला, यामध्ये भर टाकली ती काँग्रेसच्या नाना पटोले आणि शिवसेनेच्या संजय राऊत यांनी. आता, पुन्हा एकदा महाविकास आघाडीत मनसेला घेण्यासाठी शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत हे उतावीळ झाल्याचे दिसत आहेत. मनसे महाविकास आघाडीत यावी ही राऊत यांची इच्छा असणे रास्त आहे, मात्र राज ठाकरे यांची काँग्रेसला घेऊनच निवडणूक लढविण्याची इच्छा असल्याचे राऊत सोमवारी बोलले. पण काही वेळेतच त्यांनीच आपल्या वक्तव्याबद्दल घुमजावही केले होते. राज ठाकरेंची काँग्रेस सोबत येण्याची इच्छा आहे, असे मी बोललोच नव्हतो, असा मेसेज त्यांनी खुद्द राज ठाकरे यांना पाठविला. एक तर मनसेची किमान युतीबाबतची भूमिका हे मनसेचे प्रवक्ते किंवा नेते माध्यमांसमोर मांडतील. अजून शिवसेना आणि मनसे एकत्र येणार का? याबाबत कोणतीही अधिकृत घोषणा होत नसताना, राऊत महाविकास आघाडीची भूमिका का मांडत आहेत, हा खरा सवाल आहे. काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष आहे, त्यामुळे मनसे, शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्षासारखी या पक्षांची भूमिका महाराष्ट्रातून जाहीर केली जात नाही.

आघाडी आणि युती दोन्हीकडे तीन तीन पक्ष आहेत. त्यात दोन्हीकडे शिवसेना आणि राष्ट्रवादीही आहे. आता प्रश्न आहे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे महाविकास आघाडीत येतील का? मनसेची स्थापना झाल्यानंतर २००६ पासून मनसेने शिवसेना-भाजपा युतीसोबत कधी युती केली किंवा कोणत्याच पक्षासोबत निवडणूकपूर्व युती न करता काही निवडणुका लढविल्या नाहीत. मात्र ज्या लढवल्या त्या स्वबळावर लढवल्या, त्यामुळे मनसे आघाडीत आल्यास ही मनसेची पहिली युती असणार आहे.

मराठीच्या मुद्यावर ठाकरे बंधू ५ जुलैला एकत्र आले. त्यावेळी राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या सुप्रिया सुळे, आमदार जितेंद्र आव्हाड हे उपस्थित होते, मात्र काँग्रेसचा कोणीही नेता या मेळाव्याला उपस्थित नव्हता. कारण मराठी भाषेबाबत एक राजकीय पक्ष म्हणून भूमिका काँग्रेसच्या राज्यातील नेत्यांनी मांडली. मात्र प्रादेशिक अस्मितेचा पुरस्कार करणाऱ्या पक्षासोबत मेळाव्याला हजर राहणे हे काँग्रेसारख्या राष्ट्रीय पक्षाने टाळले. त्यामुळे मनसे महाविकास आघाडीत आल्यानंतर प्रादेशिक अस्मितांच्या मुद्यांवरच भर असणार आहे. ठाकरे बंधू एकत्र आल्यावर बाळासाहेबांच्या विचारांचा प्रश्नच निकाली निघणार आहे, तर मनसेच्या कार्यकर्त्यांची भावना ही ठाकरे बंधू एकत्र येण्याची आहे. मनसेने काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत महाविकास आघाडीत सहभागी होण्याची आहे की नाही? हे देखील महत्त्वाचे असणार आहे, कारण आजपर्यंत राज ठाकरे यांनी कोणाशी युतीच केलेली नाही. त्यामुळे पहिल्यांदा युती करताना किमान कार्यकर्त्यांची भूमिका ही महत्त्वाची असणार आहे. महाविकास आघाडीत मनसे सहभागी झाल्यास तिनाचे चार होतील, मात्र महाराष्ट्रातील प्रादेशिक पक्षांच्या महाराष्ट्र विकास आघाडीत काँग्रेस राहणार का हे देखील महत्त्वाचे ठरणार आहे.

---

# लाडेवडगावात ह.भ.प.अर्जुन महाराज लाड यांच्या एकसष्ठी सोहळ्याला गर्दी

## संत, कीर्तनकारांची उपस्थिती; ह.भ.प. संदिपान महाराज हासेगावकर यांचे कीर्तन

**केज । प्रतिनिधी**

**तालुक्यातील होळ येथील भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे संस्थापक, व्याकरणाचार्य ह.भ.प.अर्जुन महाराज लाड यांच्या एकसष्ठी सोहळ्यानिमित्त अखंड रामकृष्णहरी नामजप यज्ञ सोहळ्याची सांगता लाडेवडगाव येथील वेदांत साधनास्थली गुरुकुल आश्रमावर मंगळवारी (दि. १४) झाली. यावेळी ज्ञानसिंधू ह.भ.प. संदिपान महाराज हासेगावकर यांचे सुश्राव्य कीर्तन पार पडले.**

या सोहळ्यास स्वामी भारतानंद गिरी, नामदेव महाराज शास्त्री, महादेव महाराज चाकरवाडीकर, लक्ष्मण महाराज मेंगडे, आदिनाथ महाराज, मनिषानंद स्वामी, सोपान महाराज सानप, महारुद्र खाडे महाराज, प्रकाश महाराज साठे, नाना महाराज कदम, पांडुरंग महाराज मुंडे, डॉ.प्रल्हाद महाराज शास्त्री, आप्पा महाराज चौरे, अर्जुन महाराज लटपटे, पांडुरंग महाराज डोंगरेश्वर यांच्यासह राज्यभरातील वारकरी संप्रदायातील संत-महंत मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक व राजकीय क्षेत्रातील माजी मंत्री पंडितराव दौंड, नंदकिशोर मुंदडा, रमेश आडसकर, काशीराम कराड, भाई ज्ञानोबा मुंडे, बन्सी सिरसट, संतोष हांगे, विष्णू घुले, हिंदूलाल काकडे, नेताजी शिंदे, सूर्यभान मुंडे, पिंटू ठोंबरे, सौरभ सोनवणे, भगवान केदार, दत्ता धस, अयोध्याताई केंद्रे आदी मान्यवरही उपस्थित होते. यावेळी मान्यवरांसह अनेकांनी अर्जुन महाराज लाड यांचे अभिष्टचिंतन करत सोहळ्याला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लाडेवडगाव व



होळ ग्रामस्थांसह भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्था, वेदांत साधनास्थली गुरुकुल आश्रमाचे आजी-माजी विद्यार्थी आणि भाविकांनी परिश्रम घेतले. नामदेव महाराज शास्त्री यांच्या हस्ते अर्जुन महाराज लाड यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना ते म्हणाले, ''अर्जुन महाराज लाड यांनी वेदांत साधनास्थली गुरुकुल आश्रम व भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेची स्थापना करून वारकरी संप्रदायात मोठे योगदान दिले आहे. त्यांनी आयुष्याची ६१ वर्षे पूर्ण केली असून ते ३४ अपघातांतून बचावले आहेत. यामागे पांडुरंगाची कृपा आहे.'' भगवानगडाच्या स्थापनेला ७५ वर्षे पूर्ण होत असून ज्ञानेश्वर माऊलींच्या मंदिरानंतर पहिल्यांदाच भगवानगडावर मंदिर उभारण्यात येत आहे. त्या सोहळ्याचे निमंत्रणही याप्रसंगी देण्यात आले.

---

# तरूणाच्या टोळक्याकडून तरूणास तलवारीने महारहाण

**केज । प्रतिनिधी**

**शहरामध्ये रात्री एका टपरी चालकासोबत वाद निर्माण झाल्याने या वादाचे पर्यावसन भांडणामध्ये झाले. टपरी चालकास सात ते आठ जणांनी तलवारीने मारहाण करून गंभीररित्या जखमी केल्याची घटना रात्री साडेआठच्या सुमारास घडली. जखमी तरुणास अंबाजोगाई येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मारहाण करणारे हातात तलवारी आणि दांडे घेऊन आले होते, त्यामुळे शहरात रात्री दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते.**

केज बसस्थानकासमोर असलेल्या सय्यद ईरशाद अली या टपरी चालकाचे व रणसिंग गोके याच्यात गुटखा देण्या-घेण्याच्या कारणावरून वाद निर्माण झाला. या वादाचे पर्यावसन तुंबळ हाणामारीत झाले. गोके याने आपल्या अन्य साथीदारांना आणून सय्यद ईरशाद अली याच्यावर तलवारीने वार करून गंभीररित्या जखमी करण्यात आले. सदरील जखमी तरुणास अंबाजोगाई रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मारहाण करणारे हातात तलवारी, दांडे घेऊन मोटारसायकलवर आल्याने बसस्थानक परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. याचा व्हिडिओही सोशल मिडियावर व्हायरल झाला होता. या प्रकरणी दुपारपर्यंत केज पोलिसात गुन्हा दाखल झाला नव्हता. रणसिंग गोके याला केज पोलिसांनी ताब्यात घेतले.

---

# पान १ वरून...

### कर्जमाफीशिवाय माग

तर शेतकऱ्यांच्या क्रांतीचा टप्पा ठरेल, असेही ते म्हणाले. पत्रकारांनी इव्हीएमबाबत प्रश्न विचारला असता, बच्चू कडू यांनी ईव्हीएम विरोधातील देखील भूमिका मांडली. त्यांनी पत्रकारांना सांगितले, ईव्हिएमच्या विरोधात आंदोलन करणे योग्य आहे, पण हे रोप लावले कोणी? काँग्रेसने लावले आणि गरज नसताना आणले. आता भाजपने त्याचाच वटवृक्ष केला आहे. नरेंद्र मोदी स्वतः एकेकाळी ईव्हिएम बेकार आहे. ते लोकशाहीला घातक असल्याचं म्हणत होते. पण आता तेच त्याचा शस्त्र बनवून सगळ्यांना संपविण्यासाठी वापर करत आहेत अशी टिका केली. तसेच, कडू पुढे म्हणाले की, मतदान प्रक्रियेत पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी सरकारने व्हिव्हिपॅटमध्ये दिसणारे चिन्ह मतदारांच्या हाती द्यावे. त्यावर क्रमांक असावा. यामुळे मतदाराला मतदान झाले की नाही याची सहज खात्री मिळेल. त्यामुळे घटनेने दिलेला मुलभूत अधिकार आहे. हाच अधिकार सामान्य नागरिकांना मिळत नसेल तर शिल्लक काहीच राहत नाही असेही त्यांनी स्पष्ट केले.

-------------

### कुणबी प्रमाणपत्र दिल्याशिवाय

डिकसळ येथे जरांगे पाटील यांनी माध्यमांशी संवाद साधत पुढील दिशा स्पष्ट केली. शेतकरी हा महत्वाचा घटक असून, आम्ही शेतकऱ्यांची लेकरं आहोत. त्यामुळे, अतिवृष्टीने झालेल्या शेती नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी सरकारला १५ दिवसांचा अवधी देण्यात येत आहे. मात्र, कुणबी प्रमाणपत्र वितरीत झाल्याशिवाय कोणतीही नोकर भरती घेऊ नका, असेही जरांगे पाटील यांनी म्हटले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चांगला निर्णय घेतला, फडणवीसांचे कौतुक करत दिलेला शब्द पाळा ही विनंतीही जरांगे पाटील यांनी आरक्षण कुणबी प्रमाणपत्र वाटपावरुन केली आहे. राज्य सरकारने मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य करत २ सप्टेंबर रोजी कुणबी प्रमाणपत्रासंदर्भातील शासन आदेश जारी केला. हैदराबाद गॅझेटियरच्या आधारे हा शासन निर्णय झाल्याने मराठवाड्यातील कुणबींना ओबीसीतून आरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मराठा आरक्षणाच्या आंदोलनानंतर आता जरांगे पाटील शेतकरी प्रश्नावर बैठक घेणार आहेत. दिवाळीनंतर या बैठकांचे नियोजन करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. गेल्या १०० वर्षात शेती प्रश्नावर उभारले नाही असे आंदोलन उभे करण्याचा निर्धार आहे.

-----------

### कॉ.पानसरे हत्याप्रकरणातील

जामीन न मिळाल्यामुळे तिघेही कळंबा कारागृहात होते. आज १४ ऑक्टोबर रोजी तिघांच्याही जामीन अर्जावर मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापुरातील सर्किट बेंच इथं सुनावणी झाली. यामध्ये तिघांनाही न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे.त्यामुळे कॉम्रेड गोविंद पानसरे हत्या प्रकरणातील आजपर्यंतचे एकूण सर्वच १२ संशयीतांना आता जामीन मंजूर झाला आहे. दरम्यान याच मुद्दयांवर बोट ठेवत सनातन संस्थेने निरपराध हिंदुत्वनिष्ठांची साडे नऊ वर्षांची भरपाई कोण करणार? असा सवाल केला आहे.पानसरे हत्याप्रकरणी निष्पाप हिंदुत्वनिष्ठ डॉ. वीरेंद्र तावडे, अमोल काळे आणि शरद कळसकर यांना जामीन मंजूर झाल्यानंतर त्यांनी हा प्रश्न उपस्थित केला आहे.

----------

### शिवबा-तुकोबा यांचा अवमान ;

मंगळवारी झालेल्या हिंदू जन आक्रोश मोर्चामध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हणून आमदार पडळकर बोलत होते. यावेळी बोलताना म्हणाले की, अनेक जण म्हणतात शासन हिंदूच आहे मग तुम्ही आंदोलन मोर्चे काढता कशाला. पण त्याहीपेक्षा वेगळा प्रश्न असा आहे की, विशाळगड, प्रतापगड येथील अतिक्रमणे देवाभाऊंनी काढले. देवाभाऊ खंबीर आहेत. राज्यात भोसरी मतदारसंघांमध्ये आमदार महेश लांडगे यांनी जी अतिक्रमणे काढली ती कोणाची होती हे देखील पाहिले पाहिजे. विशेष म्हणजे बीडमध्ये एक तुरुंग अधिकारी कैद्यांना धर्मांतरासाठी पैशाचे आमिष आणि दबाव टाकत आहे, हे कोणालाही पटणारे नाही. चित्रपटांमध्ये एखादा कारागृह अधीक्षक असतो, तो त्याची भूमिका पार पाडतो पण हा पेट्रस गायकवाड नावाचा अधिकारी धर्मांतरासाठी कैद्यावर दबाव आणत आहे. बीडमध्ये नाही तर राज्यभर हे रॅकेट सुरू आहे. दुसरी बाब कारागृहाच्या बाहेर एका झाडावर छत्रपती शिवाजी महाराज आणि संत तुकाराम महाराज यांचा फोटो होता तो देखील या गायकवाडने काढून टाकला. एवढेच नाही तर राष्ट्रपिता महात्मा गांधी, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे आतमध्ये असलेले फोटो काढून अडगळीत फेकले. अशा अधिकाऱ्याला बूटाने तुडवण्याची गरज आहे. जर शिवबा, तुकोबाची फोटो, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे फोटो अडगळीत टाकत असेल तर याची पूजा करायची का. हा गायकवाड कारागृह अधीक्षक आहे. त्याने कारागृहात होणारे गणपती, कीर्तन भजन हे सगळे बंद केले. गणेशोत्सव दरवर्षी होतो परंतु यावर्षी त्याने बंद केला होता, मात्र कैद्यांनी आंदोलन केल्यामुळे तो सुरू झाला. याच गायकवाड नावाच्या कारागृह अधीक्षकामुळे सुनील गायकवाड नावाचा पादरी याठिकाणी येतो आणि धर्म परिवर्तन करण्यासाठी प्रयत्न करतो. तो कारागृहात येतोच कसा हा मोठा प्रश्न आहे. तेव्हा याच्यावर कारवाई केली पाहिजे. हा गायकवाड खानदेशामध्ये असताना त्याने एका देसाई नावाच्या कैद्याचा खून केला असल्याचा देखील त्याच्यावर आरोप आहे. तेव्हा अशा धर्मांतर करणाऱ्या हिंदू धर्म धोक्यात आणणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे, असेही पडळकर शेवटी म्हणाले. या हिंदू जन आक्रोश मोर्चासाठी मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

----------

### नगरपालिका मतदार

मतदार दुसऱ्या प्रभागात गेल्याने निवडणूक आयोगाने यावर हरकती नोंदविण्यासाठी १३ ऑक्टोबर ही शेवटची तारीख होती. त्यात चार दिवसाने वाढ करत हरकती नोंदविण्यासोबत काही सूचना करण्याचे आवाहनही मतदारांना केले आहे. आता या हरकती आणि सूचना १७ ऑक्टोबरपर्यंत करता येणार आहेत.

-------------

### संतप्त शेतकऱ्यांनी बसेसवर

आंदोलनाची दखल प्रशासन घेत नसल्याने संतप्त शेतकऱ्यांनी पाच बसेसवर दगडफेक केली. यात एक बसचालक जखमी झाला असल्याचे सांगण्यात येते. गंगाखेड-आळंदी (बस क्र. बी.टी. ३९६४) अहमदपूर-चाळीसगाव (क्र. एम.एच. १४-६५२२, उदगीर-गंगापूर (क्र. एम.एच. १४-८९३८) यासह अन्य दोन बस फोडण्यात आल्या. दुपारी अडीचपर्यंत हे आंदोलन सुरुच होते. या आंदोलनामुळे शहरात एकच खळबळ उडाली होती.

---------------

### आता जि.प.साठी ५ तर

येते. पण सध्याच्या धोरणानुसार, ह्या संधी मर्यादित स्वरुपात आहेत. त्यामुळे, राज्य शासनाने सदर अधिनियमानुसार सुधारणा करुन जिल्हा परिषदेसाठी ५ आणि पंचायत समितीसाठी २ स्वीकृत सदस्य नेमण्यासाठी तरतूद करावी, अशी विनंती बावनकुळे यांनी केली आहे. यामुळे समाजाभिमुख कार्य करणाऱ्या, परंतु निवडणूक लढविण्याची क्षमता नसलेल्या पात्र कार्यकर्त्यांना विकास प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी उपलब्ध होईल. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार अधिक प्रभावी आणि सर्वसमावेशक होईल, असे त्यांनी पत्रात नमूद केले आहे. महापालिका आणि नगरपालिकांमध्ये संख्याबळ लक्षात घेऊन स्वीकृत सदस्यांची नेमणूक केली जाते. आता जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये स्वीकृत सदस्य म्हणून सामान्य कार्यकर्त्यांना संधी मिळण्याची शक्यता आहे.

-----------

### खड्ड्यांमुळे मृत्यू झाल्यास

नुकसान भरपाई नाकारल्यास, नागरिकांच्या सुरक्षित रस्त्यांच्या मूलभूत हक्काकडे दुर्लक्ष केल्यासारखे होईल, ज्या हक्काचे गंभीर उल्लंघन झाले आहे, अशा स्पष्ट शब्दांत खंडपीठाने सरकारी यंत्रणांवर ताशेरे ओढले. खंडपीठाने सर्व स्थानिक स्वराज्य संस्था आणि म्हाडा, एम.एस.आर.डी.सी., सिडको अशा इतर नियोजन प्राधिकरणांना खड्ड्यांमुळे अपघात झालेल्या मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना भरपाई देण्याचा आदेश दिला. खंडपीठाने स्पष्ट केले की, ही भरपाई पीडितांना मिळू शकणाऱ्या इतर कोणत्याही कायदेशीर उपायांव्यतिरिक्त असेल. तसेच, भरपाई देणाऱ्या प्राधिकरणाने ती रक्कम खड्ड्योला जबाबदार असलेल्या कंत्राटदार किंवा अधिकाऱ्याकडून वसूल करावी, असाही आदेश दिला आहे. या जनहित याचिकेमुळे रस्ते देखभाल करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य यंत्रणा आणि कंत्राटदारांमधील त्रुटी उघड झाल्या आहेत. विविध सरकारी मार्गदर्शक तत्त्वे आणि तक्रार निवारण प्रणाली केवळ कागदावर अस्तित्वात असतानाही, नागरिकांना खड्ड्यांमुळे दुखापत आणि मृत्यूला सामोरे जावे लागत आहे, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. नागरिकांना चांगले आणि खड्डेमुक्त रस्ते मिळण्याचा हक्क आहे. या सेवेत कसूर झाल्यास, तो नागरिकांच्या संविधानाच्या कलम २१ अंतर्गत असलेल्या जीवन जगण्याच्या हक्काचे उल्लंघन आहे. ठेकेदार आणि रस्ते देखभालीची जबाबदारी असलेल्या नागरी संस्थांना आता अशा मृत्यू आणि दुखापतींसाठी जबाबदार धरले जाईल.

----------

### ओबीसीलाचा मतदान

आलेले होते.मंडल आयोगाच्या माध्यमातून सामाजिक मागासपण दूर करण्यासाठी देशातील मागास जातींना प्रतिनिधित्व मिळावे म्हणून इतर मागासवर्ग प्रवर्गात आरक्षणाची तरतूद झाली. बारा बलुतेदार १८ आलोतेदार यांना सामाजिक प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे व त्यांना माणूस म्हणून जगता आले पाहिजे हा या आरक्षणाचा मुख्य उद्देश यातून कुठेतरी या बलुतेदारांचे प्रतिनिधी शिक्षण, नोकऱ्या आणि राजकारणात प्रतिनिधित्व करू लागले पण २ सप्टेंबर २०२५ च्या शासन आदेशानुसार मूळ ओबीसीची चे अस्तित्व शासनाने धोक्यात आणले आहे. त्या अनुषंगाने सरकारने जरी आरक्षण धोक्यात आणले असले तरी परंतु उद्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत एससी, एसटी यांना या आरक्षण मध्ये घटकांना सोबत घेऊन सर्वसाधारण च्या जागावर सुद्धा निवडणूक लढवेल व दोन सप्टेंबर २०२५ चा शासन निर्णय म्हणजे मूळ ओबीसी प्रवर्गासाठी काळा कायदा आहे. अशा प्रकारचे वक्तव्य प्राध्यापक लक्ष्मण हाके सर यांनी केले आहे. याप्रसंगी ओबीसी नेते नवनाथ आबा वाघमारे, यांच्यासह ओबीसी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते . शासनाच्या वतीने उपविभागीय अधिकारी श्री पद्माकर गायकवाड यांनी निवेदन स्वीकारले.

-----------

### ५० टक्के पेक्षा जास्त आदिवासी असलेल्या

विकास मंत्री अशोक ऊईके, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, क्रीडा व युवक कल्याण मंत्री माणिकराव कोकाटे, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

---

# पान ६ वरून...

### श्री तुळजा भवानी मंदिर

असून मदतकार्य देवस्थानाचे विश्वस्त मंडळ अध्यक्ष माजी आमदार ॲड. शिवाजी सहाणे, सचिव सुभाष पाटोळे, सदस्य राजेंद्र गायकवाड, रवींद्र गायकवाड, प्रमोद लोणकर, बाळासाहेब चव्हाण, दिलीप कदम, अरुण गायकवाड व महेश पाटोळे यांच्या उपस्थितीमध्ये पार पडले. पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतात आणि डोळ्यात पाणी असताना आम्ही फुल नाही फुलाची पाकळी देण्याचा प्रयत्न करत आहोत. दिवाळी अगोदर सरकारकडून मदत जाहीर होणारच आहे. मात्र आज श्री तुळजाभवानी मंदिर देवस्थान, नाशिक वतीने आपल्या घरात मदत किट पोहचवल्या जात आहेत, याबद्दल देवस्थानच्या सर्व विश्वस्तांचे मी आभार मानतो असे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी आपल्या भाषणात सांगितले. श्री तुळजाभवानी मंदिर देवस्थान यांच्या या मदतकार्यामुळे पूरग्रस्त नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. संकट काळात समाजासाठी पुढे येणाऱ्या या उपक्रमाचे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत कौतुक केले. याप्रसंगी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अमोल जाधव, उपजिल्हाप्रमुख अजय जाधव, तालुका प्रमुख संतोष जाधव, उपशहरप्रमुख हनुमानप्रसाद पांडे तसेच आकाश जगताप, लक्ष्मीकांत दोडके, प्रतिक कांबळे आणि योगेश सारुक उपस्थित होते.

**निदान दोन दिवसाची का होईना**
**चूल पेटावी- ॲड. शिवाजी सहाणे**

श्री तुळजाभवानी मंदिर देवस्थान यांच्या वतीने पूरग्रस्त शेतकऱ्यांना छोटीशी मदत म्हणून निदान दोन दिवसाची का होईना चूल पेटावी या भावनेने किराणा मदत किटचे वाटप करत आहोत. शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी गावोगावी गरजवंत शेतकऱ्यांची यादी बनवून सर्वांना कसा लाभ मिळवून देता येईल यासाठी पुढाकार घेतला. त्यांच्या मदतीमुळेच आम्ही आज आपणा पर्यंत पोहचू शकलो,'' असे मत माजी आमदार तथा श्री तुळजाभवानी मंदिर देवस्थानचे अध्यक्ष ॲड. शिवाजी सहाणे यांनी व्यक्त केले.

--------------

### आ.संदीप क्षीरसागरांकडून

याव्यतिरिक्त बीड मतदार संघातील रस्ते व पूल वाहून गेल्यामुळे नागरिकांना ये जा करण्यास मोठी अडचण येत आहे. अनेक गावांचे संपर्क तुटल्याने हे रस्ते व पूल तातडीने दुरुस्त करण्यात यावे तसेच काही ठिकाणी नवीन रस्ते आणि पूल करण्यात यावे. यासह सार्वजनिक मालमत्तेचे झालेल्या नुकसानीचा अहवाल अजित पवारांना सुपूर्द करून तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याची विनंती केली.

--------------

### ॲड. चंद्रकांत नवले यांची

विचार करून शिवसेना पक्षाचे मुख्य नेते आणि महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री. एकनाथराव शिंदे आणि मा.खा.डॉ. श्रीकांत शिंदे यांनी माझ्यावर जो विश्वास दाखवला तो विश्वास मी सार्थ करून दाखवेन असा संकल्प आणि शब्द ड. चंद्रकांत नवले यांनी बोलताना दिला आहे. यावेळी नियुक्तीपत्र देताना शिवसेना सचिव संजयज मोरे, शिवसेना संपर्क नेते आमदार अर्जुन खोतकर, मराठवाडा संपर्क प्रमुख आनंद जाधव, शिवसेना सहसचिव एकनाथ शेलार, आमदार दराडे यांचेसह आदी उपस्थित होते.

--------------

### सहकारातून समृद्धी या

सहकार बोर्डाचे संचालक प्राध्यापक बबनराव आंधळे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त सहाय्यक निबंधक ह. प.कांबळे तसेच महाविद्यालयाच्या उपप्राचार्य अनितानाई शिंदे मॅडम व जिल्हा सहकार विकास अधिकारी आर डी वाघमारे तसेच कदम सहकार विकास अधिकारी बीड , विद्यार्थी व स्पर्धक उपस्थित होते. स्पर्धा संपल्यानंतर अर्ध्या तासाने स्पर्धेचा निकाल घोषित करण्यात आला यामध्ये प्रथम क्रमांक कु. शितल चव्हाण या विद्यार्थिनीचा आला तसेच द्वितीय क्रमांकाचे बक्षीस कु. प्रतीक्षा साखरे व चि.सिद्धार्थ वाघमारे या दोघात विभागून देण्यात आले यामध्ये परीक्षक म्हणून ह.प. कांबळे, दुसरे परीक्षक प्राध्यापक शेटे एन.पी. स्पर्धा पार पाडण्यास प्रा. सिद्धार्थ जाधव व प्राध्यापक येडे सर यांनी सहकार्य केले यामध्ये प्रथम क्रमांकाचे बक्षीस रोख रक्कम १००० रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देण्यात आले द्वितीय बक्षीस रोख रक्कम ५०० रुपये व प्रमाणपत्र देऊन कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे सर यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले कार्यक्रमाचे प्रस्ताविक कदम यांनी केले व आभार प्रदर्शन जिल्हा सहकार विकास अधिकारी आर डी वाघमारे यांनी केले.

--------------

### आदित्य एज्युकेशन ग्रुपमध्ये

विशेष कौतुक केले. कार्यक्रमात विद्यार्थिनी निकिता थोरात हिने मनोगत व्यक्त करताना सांगितले, या कार्यशाळेतून आम्हाला सिव्हिल इंजनिअरिंग क्षेत्रातील व्यावहारिक ज्ञान मिळाले. भविष्यातील करिअरसाठी हे मार्गदर्शन अत्यंत उपयुक्त ठरेल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. दिपेश तावरे यांनी केले, तर आभार प्रा. रवी कांबळे यांनी मानले. या उपक्रमाच्या यशासाठी प्रा. गरकळ , प्रा. जाधव, प्रा. डोंगरे, प्रा. चावरे, प्रा. सोहेल मोमीन यांच्यासह संपूर्ण टीमने परिश्रम घेतले. संपूर्ण कार्यशाळा प्राचार्य डॉ. निलेश बहादुरे, प्राचार्य डॉ. राहुल खडके, प्राचार्य डॉ. झिशान शेख आणि अकॅडमिक डीन प्रा. सय्यद दायमी यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या संपन्न झाली. आदित्य एज्युकेशन ग्रुपने आयोजित केलेली ही कार्यशाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण कौशल्यविकासासाठी एक प्रभावी पाऊल ठरली. आदित्य संस्थेमुळे विद्यार्थ्यांना उद्योगविश्वाशी जोडणाऱ्या उपयुक्त संधी निर्माण होत आहेत. अशा कार्यशाळा म्हणजे रोजगार क्षमतेकडे नेणारे खरे पाऊल आहे.

-शाम पैठणकर, असोसिएट इंजिनियर, अल्ट्राटेक सिमेंट, छत्रपती संभाजीनगर विभाग

--------------

### योगेश्वरी पॉलीटेक्निकमध्ये

मॅन्युफॅक्चरिंग यांसारख्या प्रगत क्षेत्रांत काम करण्यासाठी यंत्र अभियंत्यांना भक्कम पाया मिळतो. त्यामुळे बदलत्या तंत्रज्ञानासोबत ते सहज जुळवून घेऊ शकतात. अशी माहिती दिली.अध्यक्षीय समारोपात बर्दापूरकर यांनी यंत्र अभियांत्रिकी क्षेत्रात ऑटोमोशन ग्रीन एनर्जी आणि स्मार्ट सिस्टमच्या युगात, कौशल्यसंपन्न यंत्र अभियंत्यांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे हे क्षेत्र निवडणे म्हणजे केवळ नोकरी मिळवणे नाही, तर भविष्यासाठी उद्योजकतेचे नवे मार्ग तयार करणे आहे असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य रमण देशपांडे यांनी केले, तर सूत्रसंचलन व आभार यंत्र अभियांत्रिकी विभाग प्रमुख प्रा.शाम गडदे यांनी मानले. यावेळी ऑटोमोबाईल विभागाचे प्रमुख प्रा.बप्पासाहेब सोनवणे प्रा.सचिन हारे उपस्थित होते.

--------------

### अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी

प्रमाण अनुक्रमे ६०:४० असे राहील. ग्रामपंचायत कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून ही कामे पाहणार आहे.

**शेतकऱ्यांना दिलासा ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ**

या दोन्ही निर्णयांमुळे अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. सिंचन विहिरींची दुरुस्ती आणि नापीक जमिनी पुन्हा तयार झाल्याने पुढील हंगामात शेतकऱ्यांना सिंचनाद्वारे पीक घेणे शक्य होईल. या योजनांची अंमलबजावणी वेळेत व काटेकोरपणे होणे अत्यावश्यक असून, त्यातून शेतकऱ्यांचा आत्मविश्वास पुन्हा निर्माण होणार असल्याचे सह आयुक्त डॉ. अनंत गव्हाणे यांनी सांगितले.

---------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि. १५ ऑक्टोबर २०२५ | ३

# तपेनिमगाव परिसरातील अवैध वाळू उपशावर तलवाडा पोलिसांची कारवाई

## दोन केन्यासह दोन ट्रॅक्टर असा बारा लाखांचा मुद्देमाल जप्त

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलिस ठाणे हद्दीतील तपेनिमगाव परिसरात छुप्या मार्गाने केनिच्या सहाय्याने अवैध वाळू उपसा होत असल्याची गुपनिय माहिती तलवाडा पोलिसांना मिळताच त्यांनी या अवैध वाळू उपश्यावर दिं. १३ ऑक्टोबर रोजी धाड टाकली यामध्ये दोन ट्रॅक्टर सह वाळू उपसा करणाऱ्या दोन केन्या असा जवळपास आठ ते दहा लाखाचा मुद्देमाल जप्त केला आहे. हि कारवाई पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पाडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी अनिल कटके, सपोनि मनोज निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक स्वापनिल कोळी, पोह हनुमान जावळे, पोह कैशव गोरे, पोह विशाल वडमारे, पोह, वाहक सुग्रीव रुपणर, यांनी कामगिरी केली आहे.



असून याप्रकरणी तलवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलिस ठाणे हद्दीतील तपेनिमगाव परिसरात मागील अनेक दिवसांपासून छुप्या मार्गाने केनिच्या सहाय्याने अवैध वाळू उपसा सुरू आहे, वाळू घाटाचा कोणताही लिलाव नसतांना हा उपसा सुरू असल्याने शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे. याकडे तहसील चे अधिकारी आणि कर्मचारी लक्ष देत नसल्याने हा अवैध वाळू उपसा छुप्या मार्गाने जोरात सुरू होता

या कारवाई मध्ये दोन ट्रॅक्टर सह वाळू उपसा करणाऱ्या दोन केन्या जप्त करण्यात आल्या. याची नोंद पोलिस ठाण्यात करण्यात आली मुद्दे माल बारा लाखांचा जप्त करण्यात आला आहे. असून ट्रॅक्टर मालक, चालक आणि अवैध उपसा करणाऱ्यावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली आहे

## थोडक्यात...

### पत्रकार जावेद शेख निवडणुक लढण्याच्या तयारीत

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरात सुरू झालेल्या नगरपरिषद निवडणुकीच्या चर्चेला आता एक नवे वळण मिळाले आहे. शहरातील सर्वपरिचित व सर्वसमावेशक चेहरा असलेले युवा पत्रकार जावेद शेख सर हे नगरसेवक पदाच्या शर्यतीत उतरू शकतात, अशी चर्चेला उधाण आले आहे. वार्ड क्रमांक ९, १० किंवा ११ मधून ते मैदानात उतरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. जावेद शेख सर यांनी अनेक वर्षे समाजहितासाठी निःस्वार्थपणे कार्य केले आहे. जात, धर्म, पंथ, वंश या सगळ्यांच्या पलीकडे जाऊन त्यांनी मानवतेचा धर्म सर्वोच्च या तत्त्वावर काम केले. पत्रकारितेतून समाजातील वंचित, पीडित घटकांचा आवाज बुलंद करणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाने सामाजिक न्याय, पारदर्शकता आणि विकासाच्या मुद्द्यांवर सतत जनतेचे प्रतिनिधित्व केले आहे. माजी आमदार अमरसिंह पंडित व विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांनी जर जावेद शेख सर यांना अधिकृत उमेदवारीची संधी दिली, तर ते या भागात राजकीय करिश्मा निर्माण करू शकतात, अशी प्रबळ चर्चा राजकीय वर्तुळात आहे.



### काँग्रेसची आज महत्वपुर्ण बैठक, इच्छुक उमेदवारांनी उपस्थित रहावे–बजगुडे

बीड । प्रतिनिधी



आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ०१ वाजता शासकीय विश्रामगृह बीड याठिकाणी बीड तालुका व शहर काँग्रेस कमिटीची बैठक असुन काँग्रेसचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते व निवडणूक लढण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांनी उपस्थित राहण्याचे आवाहन भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी केले आहे. या बैठकीस जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल भैया सोनवणे, बीड विधानसभा निरीक्षक अन्वर बापू देशमुख व काँग्रेस पक्षाचे आजी माजी ज्येष्ठ पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. आगामी होवु घातलेल्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने जिल्ह्यात स्वबळावर लढण्याचा नारा दिलेला असुन त्याच पार्श्वभूमीवर बीड शहर व तालुका काँग्रेसची पुर्व तयारी बैठक दिनांक १५ ऑक्टोबर रोजी दुपारी ०१ वाजता बोलावली असल्याचे तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी कळवले आहे.



### तालुकास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत जि. प. माध्यमिक चौसाळा शाळेचे यश

चौसाळा । प्रतिनिधी

येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे तालुकास्तरीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेसाठी क्रीडाशिक्षक श्री आनंद वाघमारे व प्रशांत वायभट यांनी खूप मेहनत घेऊन विद्यार्थ्यांचा सराव करून स्पर्धेसाठी तयार केले, दिनांक १३ ऑक्टोबर रोजी बीड जिल्हा स्टेडियम येथे तालुकास्तरीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील विद्यार्थी अफसर अब्दुल अन्सारी या विद्यार्थ्याने सहाशे मीटर धावणे स्पर्धेत १४ वर्षे वयोगटात प्रथम क्रमांक पटकावला, तर कोकणे सिद्धेश भागवत या विद्यार्थ्याने शंभर मीटर धावणे स्पर्धेत चौदा वर्षे वयोगटात द्वितीय क्रमांक मिळवला, तर रिले स्पर्धेत १४ वर्ष वयोगटामध्ये शिवराज नाईकवाडे सार्थक गोलेकर सार्थक तांदळे सिद्धेश कोकणे या गटाने तृतीय क्रमांक मिळवला, तालुकास्तरीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत यश मिळवलेल्या सर्व खेळाडूंची मुख्याध्यापिका श्रीमती पद्मजा हंम्पे तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विनोदजी शिंदे व सर्व सदस्य तसेच विशेष कौतुक ज्येष्ठ विस्तार शिक्षणाधिकारी श्रीमती प्रणिता गंगाखेडकर मॅडम यांनी खेळाडूंचे व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे क्रीडा शिक्षक श्री आनंद वाघमारे व प्रशांत वायभट यांचे अभिनंदन केले तसेच या स्पर्धेसाठी शाळेतील सर्व शिक्षक वृंदांचे सहकार्य लाभले.

### स्वाराती रुग्णालयास सीएसआर फंडातुन कार्डियाक ॲम्बुलन्स येणार

अंबाजोगाई । प्रतिनिधी




अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयास महाराष्ट्र राज्य विद्युत ट्रान्समिशन कं. लि; संभाजी नगर या संस्थेच्या सीएसआर फंडातुन कार्डियाक ऍम्बुलन्स मंजूर करण्यात आली आहे.

स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालय परिसरातील –हदयरोग व इतर गंभीर आजाराने आजारी असणा–या रुग्णांना तातडीने वैद्यकीय सुविधा मिळाव्यात म्हणून कार्डियाक ऍम्बुलन्स मिळवून देण्यासाठी या विभागाच्या आ. नमिता मुंदडा यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत ट्रान्समिशन कं लि; संभाजी नगर यांच्या कडे प्रयत्न केले होते. अलिकडेच या कंपनीचे वतीने स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयासाठी कार्डियाक ऍम्बुलन्स साठी १० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या निधीतून या रुग्णालयास लवकरच कार्डियाक ऍम्बुलन्स उपलब्ध होणार आहे.

# पुरग्रस्थ सांडस चिंचोली येथे ब्लँकेट वाटप व मोफत आरोग्य तपासणी शिबिर

माजलगाव । प्रतिनिधी

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर चे पिठाधीश परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशीर्वादाने व आदरणीय दादासाहेबांच्या आदेशानुसार सद्गुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर आयोजित मोफत आरोग्य तपासणी नाडी परीक्षण व सर्व रोग निदान शिबिर व पुरग्रस्थांसाठी ब्लँकेट माजलगाव तालुक्यातील सांडस चिंचोली येथे वाटप करण्यात आले.



या शिबिराचे उदघाटन दिपप्रज्वलन व परब्रह्म भगवान श्री स्वामी समर्थ महाराज व धन्वंतरी पूजन करुन झाले. यावेळी डॉ मोहन गौरकर, डॉ कृष्णा खैरनार, डॉ शिल्पा मॅडम तसेच परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज कॅन्सर रिसर्च सेंटर ची टीम, सरपंच शुभम भोसले, शिवशंकर भंडारे, तालुका प्रतिनिधी योगेश कराड, नारायण शेजुळ , संग्राम ठोंगे इत्यादी उपस्थित होते. यावेळी डॉ मोहन गौरकर यांनी सद्गुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर व आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. या शिबीराचे प्रास्ताविक शिवशंकर भंडारे यांनी केले. या वेळी गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिबिरात नाडी परीक्षण, बीपी, शुगर, इसीजी, फिजिओथेरपी इत्यादी सेवा मोफत देण्यात आली.



# वंजारी समाजाचा वधू-वर मेळावा उत्साहात

बीड । प्रतिनिधी

नवीन नाशिक ता. १३ वंजारी समाजाचा ७८ वा वधूवर सूचक मेळावा रविवारी (ता.१२) मोठ्या उत्साहात झाला. संपूर्ण वंजारी समाज, उत्कर्ष मंडळ मुंबई यांच्यातर्फे वंजारी समाज मेळाव्याचे आयोजन केले होते. प्रारंभी संत भगवानबाबा व लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

लोकनेते प्रतिष्ठानचे अध्यक्ष गोविंद घुगे, डॉ. मंजूषा दराडे, बाळासाहेब घुगे, मंडळाचे अध्यक्ष मारुती उगले, उपाध्यक्ष शिवाजी नागरे, जयवंत आव्हाड, सुरेश सांगळे, योगेश कराड, खजिनदार बबन महादेव गंधास, सुरेश लांडगे यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी २५० मुले आणि मुलींचे बायोडाटा आले तर कार्यक्रमस्थळी २० मुलामुलींचे लग्न जमविण्यात आले. सर्व पाहुण्यांचा मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या वेळी डॉ. वसंत मुंडे परळीकर म्हणाले की, मुला मुलींनी जास्त अपेक्षा न ठेवता आपला जोडीदार निवडावा, योग्य वेळात लग्न झाले पाहिजे. गोविंद घुगे म्हणाले कि, एखाद्या संस्थेने सलग ३० वर्ष काम करणे अवघड असते, परंतु संस्थेने मुंबईहून येऊन हे काम केले ते कौतुकास्पद आहे. सुरेश सांगळे यांनी सूत्रसंचालन केले. शिवाजी नागरे यांनी आभार मानले.

# वृत्तपत्रांच्या जाहिरात बिलाच्या मंजूर निधीला खर्च करण्यास सरकारकडून परवानगी नसल्याने वृत्तपत्रांची दिवाळी अंधारात

**बीड । प्रतिनिधी**

राज्यभरातील शासन मान्य जाहिरात यादी वरील वृत्तपत्रांना माहिती व जनसंपर्क विभागाकडून जिल्हा माहिती कार्यालयामार्फत दिलेल्या दर्शनी जाहिरातीचे लाखो रुपयाचे बिले थकीत ठेवले जात आहेत. विशेष बाब म्हणजे या जाहिरात प्रसिद्धीसाठी शासनाने पूर्वीच निधी मंजूर करूनही सदरील खर्चास माहिती संचालक कार्यालयाला परवानगी दिली जात नसल्याने सदरील बिले माहिती कार्यालयाकडून प्रलंबित ठेवण्याचा प्रकार राज्य सरकार करीत असल्याची माहिती आहे. यामुळे वृत्तपत्र कार्यालयातील कर्मचाऱ्यांवर दिवाळी अंधारात साजरी करावी लागणार आहे.

दरम्यान दुसरीकडे फुकटच्या योजनांसाठी इतर निधीची पळवा पळवी केली जात असताना निधी मंजूर असतानाही वृत्तपत्रांची बिले प्रलंबित ठेवणे संतापजनक आहे. अशी प्रतिक्रिया राज्यभरातील संपादकाकडून व्यक्त केली जात आहे. राज्यातील सर्व जिल्हा माहिती अधिकारी कार्यालयाकडे सर्वच दैनिक, साप्ताहिक वृत्तपत्रांच्या शासकीय जाहिरातीची प्रलंबीत बिलाचे पेमेंट दिवाळी पूर्वी शासनाने द्यावे अशी मागणी राज्यभरातील संपादक संघटनांनी तसेच जिल्हा पत्रकार संघांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व वित्त मंत्री व महासंचालक माहिती विभाग मुंबई यांचे कडे एक महिन्यापूर्वीच निवेदनाद्वारे केली होती , परंतु या निवेदनावर शासनाकडून अजूनही सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. दिवाळीचा सन पाच दिवसावर येऊन ठेपला आहे. अजून ही या मागणी संदर्भात कोणतीच हालचाल नाही. याबाबत जिल्हा माहिती अधिकारी म्हणतात त्या बिलांची ग्रांटच अजून शासनाने पाठविली नाही. त्यामुळे आम्ही काहीही करू शकत नाही. असे सांगितले जात आहे. एकीकडे सरकार अनेक फुकट पैसे वाटपाच्या योजना सुरु केल्या आहेत. त्यासाठी अनेक विभागाचा निधी त्या योजनाकडे वळविण्यात आला आहे. त्याचा फटका वृत्तपत्रांना आणि पत्रकारांनाही बसला आहे. विशेष बाब म्हणजे जाहिरात प्रसिद्धीसाठी सरकारने ठराविक निधी मंजूर केलेला असतानाही हा निधी खर्च करण्यास माहिती व जनसपर्क कार्यालयाला परवानगी देण्यात येत नसल्यामुळे सर्व दैनिक, साप्ताहिक्? वृत्तापत्रांची ही बिले प्रलंबीत राहिले आहेत. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री वित्त मंत्री यांनी यामध्ये मार्ग काढून दिवाळी पूर्वी वृत्तपत्रांच्या या प्रलंबीत प्रलंबित बीले देण्यात यावीत अशी राज्यभरातील संपादक आणि वृत्तपत्रांकडून वृत्तपत्र मालकाकडून शासनाकडे केली आहे.

लाडक्या बहिणीसाठी निधीची पळवा पळवी तर छोट्या वृत्तपत्रांबाबत सरकारची सापत्न भावाची वागणूक

राज्य सरकार एकीकडे लाडकी बहीण योजनेसाठी समाज कल्याणचा निधी वळवीत असताना मात्र राज्य शासनाच्या योजनांच्या प्रसिद्धीसाठी वृत्तपत्रांना प्रसिद्धीस दिलेल्या जाहिरात बिलासाठी मंजूर केलेला निधीही माहिती व जनसंपर्क कार्यालयाला खर्च करण्यास परवानगी देत नसल्याने एकीकडे सरकार मतासाठी लाडक्या बहिणींना डोक्यावर घेत आहे तर दुसरीकडे वृत्तपत्रांना सापत्न भावाची वागणूक देऊन पायाखाली घेण्याचा प्रकार करत आहे. राज्यभरातील हजारो वृत्तपत्रांची लाखो रुपयांची बिले आहेत. दिवाळी तोंडावर आली असतानाही वृत्तपत्रांची जाहिरात बिले न मिळाल्याने वृत्तपत्र कार्यालयातील कर्मचारी यांच्यावर ऐन दिवाळीत पगार न मिळाल्यास उपासमारीची वेळ येऊ शकते. त्यामुळे शासनाने आमच्या मागणीची दखल घेऊन तात्काळ जाहिरात बिल अदा करावेत नसता राज्यभरातील संपादक लोकशाही मार्गाने आंदोलन करतील.

विलास डोळसे,

राज्य सरचिटणीस, क वर्ग वृत्तपत्र संपादक संघटना, महाराष्ट्रमहाराष्ट्र

### अंशत: अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्पा अनुदान वितरणाचा शासन निर्णय पारित

बीड । प्रतिनिधी

राज्यातील अंशतः अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्प्यानुसार वेतनाच्या ऑक्टोबर महिन्याच्या तरतुदीचा अनुदान वितरण आदेश पारित करावा अशी मागणी राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने करण्यात आली होती या मागणीला यश आले आहे. आज सोमवार दिनांक १३ ऑक्टोबर रोजी अंशत: अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्पा अनुदान ऑक्टोबर महिन्याच्या वेतनासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. सदर निधी वितरणाचा शासन आदेशही आज जारी करण्यात आला आहे. राज्यातील सर्व आजी माजी शिक्षक आमदार आणि विविध शिक्षक संघटना यांच्यासह ८ व ९ जुलै २०२५ रोजीच्या राज्यव्यापी शाळा बंद आंदोलनाचे हे यश असल्याचे विनाअनुदानित शाळा कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांनी सांगितले. सदर शासन आदेश निर्गमित झाल्याने सध्या अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# निकालापूर्वीच विद्यार्थ्यांना नौकरी

## योगेश्वरी पॉलिटेक्निकचा अभिनव उपक्रम

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तंत्रशिक्षणात महाराष्ट्रात अग्रेसर असणाऱ्या अंबाजोगाई येथील योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निक मधील विद्यार्थ्यांनी तृतीय वर्षाच्या पहिल्या सत्रातच नोकरी मिळवत नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. पॉलिटेक्निक मधील १३ विद्यार्थी तृतीय वर्षात असतानाच झ्रेशीलेप तशर्पीीशी ळपवळर श्रींव. या नामांकित कंपनीत निवड झालेली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये अश्विनी हारे, निकिता चव्हाण ,कोमल माळी, भूमिका परदेसी ,श्वेता ढवारे, निलेश चौगुले ,माऊली दौंड, निखिल वचकरण, ओम लाखे ,अभय राऊत, कृष्णा चोंदे, संदीप माने आणि गणेश थोरबोले यांचा समावेश आहे.



निवड झालेले विद्यार्थी हे मराठवाड्यातील ग्रामीण भागातील गरीब, होतकरू व मजुरी व्यवसाय करणाऱ्या पालकांचे विद्यार्थी असून, त्यांना महाविद्यालयातूनच कॅम्पस मुलाखतीतून नोकरी लागल्यामुळे अल्पावधीतच विद्यार्थी कुटुंबाचा आधार बनले आहेत. ही संस्थेच्या दृष्टीने अत्यंत अभिमानाची आहे.

कंपनीमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना नियुक्तीपत्र वितरण समारंभ आयोजित करण्यात आला.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, सहसचिव भीमाशंकर शेटे, योगेश्वरी पॉलिटेक्निकचे प्राचार्य रमण देशपांडे व कंपनीचे प्रतिनिधी रामनिवास मावळ, दैवेश वैद्य आदी उपस्थित होते. या कॅम्पस मुलाखतीसाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल व यंत्र अभियांत्रिकी विभाग प्रमुख प्रा. शाम गडदे, प्रा. बप्पासाहेब सोनवणे व प्रा. सचिन हारे यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमाबाबत संस्थेचे उपाध्यक्ष गणपत व्यास, कार्यकारी उपाध्यक्ष ड. जगदीश चौसाळकर, सचिव कमलाकर चौसाळकर यांनी अभिनंदन केले आहे.

# मैदानी क्रिडास्पर्धेत भागूजीराव ढेकळे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

गेवराई । प्रतिनिधी

येथील आर. बी. अट्टल महाविद्यालयाच्या क्रिडांगणावर संपन्न झालेल्या तालुकास्तरीय मैदानी क्रिडा स्पर्धेमध्ये कृषि पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पाडळसिंगीच्या खेळाडूंनी घवघवीत यश मिळविले आहे.

शनिवार दि.११ ऑक्टोबर रोजी आर. बी. अट्टल महाविद्यालय, गेवराई येथे घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय मैदानी क्रिडी स्पर्धेमध्ये कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदिपक कामगिरी केली असून या स्पर्धेमध्ये १९ वर्षे वयोगटातील मुलामध्ये राऊत सार्थक गोकुळ या विद्यार्थ्याने ४०० मीटर अडथळा शर्यत व भालाफेकमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच १९ वर्षे वयोगटातील मुलीमध्ये शिंदे श्रद्धा लक्ष्मण ४०० मीटर धावणे मध्ये द्वितीय क्रमांक, भडके अस्मिता अशोक हिने ५०० मीटर धावणे मध्ये द्वितीय क्रमांक आणि दिंडे शिवकन्या एकनाथ या विद्यार्थीनीने ३००० मीटर धावणे मध्ये द्वितीय क्रमांक संपादन केला. त्याचबरोबर बीड येथे झालेल्या जिल्हास्तरीय अजिंक्यपद कराटे स्पर्धेमध्ये १७ वर्षे वयोगटातील साठे किशोरी लक्ष्मण हिने प्रथम क्रमांक मिळवला आहे. या सर्व विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेकरीता निवड झाली आहे. या खेळाडूंना क्रिडाशिक्षक आर.डी. घोरड, प्रा. कळासे ए. आर. यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, सहाय्यक प्रशासन अधिकारी योगेश पवार, कार्यवाहक एम. ए. राऊत, कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य थिटे ए. एस., पर्यवेक्षक रांजवण आर. डी., प्रा.राजेंद्र सोनवणे, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

# नेत्यानो, मुलगा–पुतण्याला उमेदवारी देण्यापेक्षा सामान्य कार्यकर्त्यांना उमेदवारी देऊन मोठे करा

## युसूफवडगांव जि.प.गट सर्वसाधारण तर प.स.गण एसी पुरूष प्रवर्गासाठी आरक्षित

युसूफवडगांव । प्रतिनिधी

सध्या सर्वत्र जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीचे वारे वाहत असुन कालच याचे आरक्षण जाहीर करण्यात आले असुन युसूफवडगांव जि.प गट ओपन पुरूष तर पं.स गण एसी पुरूष वर्गासाठी आरक्षित झाले आहे तरी नेत्यानो जि.प साठी स्वत:च्या मुलाला अथवा पुतण्याला उमेदवारी देण्यापेक्षा सर्वसामन्य कार्यकर्त्याला उमेदवारी देऊन त्यांना निवडुन आणा.

जवळपास गेल्या तीन वर्षापासून जि.प. व पंचायत समितीची निवडणुक लांबत चालली होती पण आता एकदाचे निवडणुकीचे पडघम वाजयला सुरूवात झाली असुन कालच जिल्हा परीषद गटाचे व पंचायत समिती गणाचे आरक्षण जाहीर झाले असुन यामध्ये केज तालुक्यातुन एकमेव युसूफवडगांव जिल्हा परिषद गटाचे आरक्षण हे सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे त्यामुळे सहाजिकच या जि.प गटातुन निवडणुक लढण्यासाठी तालुक्यातील दिग्गज नेते येथुन स्वतः किंवा मुलगा अथवा स्वतःच्या पत्नीला अगर पुतण्याला उमेदवारी जाहीर करून निवडणुकीला सामोरे जाऊ शकतात प्रत्येक निवडणुकीला आपल्याच घरात उमेदवारी घेण्यापेक्षा ज्या सर्वसामन्य कार्यकर्त्यांच्या जीवावर तुमच राजकारण चालत ज्यांच्या जीवावर राजकारणात विविध पदांचा उपभोग घेता ज्यांच्या जीवावर तुम्ही प्रत्येक निवडणुक लढता व विजयी होताच त्यांना साईटला करता अशा त्या सर्वसामन्य कार्यकर्त्यांचा कधीतरी विचार करा आणि यावेळेस तरी स्थानिकच्या सर्व सामान्य व एकनिष्ठ कार्यकर्त्यांला उमेदवारी देऊन त्याला निवडुन आणण्याचे काम करा कारण गेल्या १५ वर्षांपासून स्थानिकच्या कार्यकर्त्यांना जि.प निवडणुकीला तिकीट दिलेच नाही प्रत्येक वेळेस स्थानिकच्या कार्यकर्त्यांना पंचायत समितीचे तिकीट देऊन त्यावरच बोळवण करत आहेत आता तरी सामान्य कार्यकर्त्याला जिल्हा परिषद निवडणूकीसाठी तिकीट द्या तेवढीच अपेक्षा.

# शेतकरी अडचणीत सोयाबीन काढणीला वेग; पण योग्य भावाने खरेदी होईना

पुणे : सोयाबीन काढणी सुरू झाली असली तरी शासनाच्या हमीभाव खरेदी केंद्रांचा पत्ता अद्याप लागलेला नाही. बाजारात भाव फक्त ३ हजार ९०० ते ४ हजार १०० रुपयांपर्यंत मिळत असल्याने शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल हजार रुपयांहून अधिक तोटा सहन करावा लागत आहे. मेहनतीचे मोल न मिळाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत आणि शासनाच्या खरेदी आदेशाची आतुरतेने वाट पाहत आहेत.



राज्यात सध्या सोयाबीन काढणीला वेग आला आहे. शेतकरी जलदगतीने काढणी व मळणी करत असतानाच, शासकीय हमीभाव खरेदी केंद्रांचा पत्ता अद्याप लागलेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता आणि नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. शासनाचा खरेदी आदेश निघालेला नसल्याने शेतकरी व्यापाऱ्यांकडेच माल विकण्यास भाग पडले असून, त्यांना तोट्याचे दर मिळत आहेत. सध्या सोयाबीनला ३ हजार ९०० ते ४ हजार ३१० रुपये प्रति क्विंटल एवढा बाजारभाव मिळत आहे, तर केंद्र सरकारने घोषित केलेला हमीभाव ५ हजार ३२८ रुपये आहे. म्हणजेच शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल सुमारे १ हजार २०० ते १ हजार ४०० रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे. उत्पादन खर्च, मजुरी, खते आणि कीटकनाशकांच्या दरवाढीमुळे शेतकऱ्यांच्या हातात काहीच उरत नाही. सोयाबीन काढणीसाठी मजूर आणि यंत्रासाठी प्रत्येकी ५ हजार रुपयांहून अधिक खर्च येतो. एवढी मेहनत घेऊन जेव्हा बाजारात भाव हमीभावापेक्षा हजार रुपयांनी कमी मिळतो.


दुसरीकडे काढणीच्या हंगामातही अधूनमधून पावसाचे सत्र सुरूच असल्याने शेतकरी जलदगतीने काढणी व मळणी करत आहेत. मात्र, ओलावा वाढल्याने दाण्याच्या गुणवत्तेवर परिणाम होत असून दर आणखी घसरू शकतात, अशी भीती व्यक्त केली जात आहे. शासनाने तातडीने सोयाबीन खरेदी केंद्रे सुरू करावी. शेतकऱ्यांना हमीभावानुसार थेट खरेदी करण्याचा निर्णय घ्यावा. नुकसानीचा आढावा घेऊन भरपाईची घोषणा करावी. अशा मागण्या शेतकऱ्यांमधून होत आहेत. सोयाबीन काढणीचा हंगाम सुरू असून, बाजारात मालाचा ओघ वाढला आहे. पण शासनाने खरेदी केंद्रांबाबत स्पष्ट भूमिका घेतलेली नाही. शेतकऱ्यांचा खर्च, तोटा आणि कष्ट वाढत असताना हमीभाव फक्त कागदावरच राहिला आहे.

## शेळ्या मेंढ्यातील आंत्रविषार; जाणून घ्या लक्षणे आणि उपचार!

शेळया मेंढ्यामध्ये आढळणारा आंत्रविषार हा आजार पावसाळ्यात उगवलेले कोवळे लुसलुशीत गवत भरपूर प्रमाणात खाल्ल्यामुळे या आजाराचा प्रादुर्भाव दिसून येतो. हा आजार सर्व वयोगटातील शेळ्या-मेंढ्यांना होतो. परंतु लहान करडे/कोकरांमध्ये मृत्युदर जास्त दिसून येतो. हा आजार कमी कालावधीचा आहे. प्रादुर्भाव झाल्यापासून दोन ते बारा तासांत मृत्यू होतो. त्यामुळे या आजारावर प्रतिबंधक उपाय करणे फारच गरजेचे आहे. जाणून घेऊया आजाराची लक्षणे आणि त्यावर उपचार.

आंत्रविषार आजाराची लक्षणे : शेळ्या-मेंढ्या निस्तेज दिसतात. एका जागेवर बसून राहतात. दूध पीत नाहीत. पातळ हिरव्या रंगाची संडास करतात. तोंडास फेस येतो, फिट येते. बाधित पिल्ले हवेत उडी मारून जमिनीवर पडतात. मान वाकडी होते. त्यांचा मृत्यू होतो. मोठ्या शेळ्या-मेंढ्या तीव्रतेनुसार काही दिवसांपर्यंत आजारी राहतात.

फऱ्यामध्ये ताप येणे, तोंडातून फेस येणे, अडखळत चालणे, तोल जाणे, गोल फिरणे, चक्कर येणे तसेच श्वसनास त्रास होणे



इत्यादी लक्षणे दिसतात. शेवटच्या टप्प्यात पोटफुगी, जुलाब ही लक्षणे आढळून येतात. पोट फुगल्यामुळे जनावर उठबस करतात. सारखे पाय झाडतात.

आंत्रविषार आजारावर उपचार : हा अल्प मुदतीचा आजार असल्यामुळे प्रभावी उपचार करणे शक्य होत नाही. यासाठी अधिक खर्चसुद्धा होतो. पशुवैद्यकाच्या सहाय्याने विशिष्ट प्रतिजैविके दिल्यास पोटातील विष शोषण्याचे प्रमाण कमी होते, जीवाणूंची वाढ थांबते. कळपातील मरतुक कमी होऊ शकते. एखादे लिव्हर टॉनिक व शिरेवाटे ग्लुकोज दिल्यास फायदा होऊ शकतो. प्रथमोपचार म्हणून लहान पिलांना हगवण सुरू झाल्यानंतर मिठाचे पाणी किंवा इलेक्ट्रोलाईट्सचे द्रावण पाजावे. आजारास प्रतिबंध करणे, अत्यंत सोपे, कमी खर्चाचे, व प्रभावी मध्यम आहे. मुख्यता लसीकरण व आहारातील व्यवस्थापन करून या आजाराचा प्रादुर्भाव टाळता येतो.

## अळू लागवडीतून मिळेल भरघोस नफा

बाजारात आपल्याला अळूची भाजी हमखास पाहायला मिळते. अळूची भाजी ही तशी दुर्मिळ असते. मात्र, सध्या एकाच भाजीपाल्याची आवक मोठ्या प्रमाणात होऊन, दर घसरणीमुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसतो. अशावेळी काही शेतकरी राज्यात वेगळा मार्ग निवडत अळूची शेती करताना आढळून येत आहे. विशेष म्हणजे अळूचे आयुर्वेदिक गुणधर्म असल्याने, काही जण अळूच्या भाजीचा प्रकर्षाने आहारात समावेश करतात. याच पार्श्वभूमीवर आज आपण अळू लागवड आणि अळूच्या अधिक उत्पादनक्षम प्रजातीबद्दल जाणून घ्या.



पाणी असल्यास बारमाही पीक : अळू हे जोमाने वाढणारे पीक आहे. अळूच्या पानांचा उपयोग आहारात वडी तयार करून केला जातो. याशिवाय अळूचे कंद उकडून खाल्ले जातात. खरिप हंगामातील अळू लागवड जून-जुलै महिन्यात करतात. तर पाण्याची सोय असल्यास वर्षभर अळूचे पीक घेता येते. प्रामुख्याने कोकण पट्ट्यात अळूचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. तर पश्चिम महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्याने अळू उत्पादन घेण्यात आपले स्थान निर्माण केले आहे.

अळूच्या प्रमुख प्रजाती : राजेंद्र अळू : राजेंद्र अळू हे वाण कंदांची लागवड केल्यानंतर जवळपास १६० ते १८० दिवसांमध्ये पाने काढणीला येतात. या वाणापासून प्रति हेक्टरी १८० ते २०० क्विंटल उत्पादन मिळते. व्हाईट गौरेय्या : व्हाईट गौरेय्या हे अळू वाण लागवडीनंतर जवळपास १८० ते १९० दिवसांमध्ये पाने तोडणीला येतात. या वाणाच्या लागवडीपासून शेतकऱ्यांना हेक्टरी १७० ते १९० क्विंटल उत्पादन मिळते. पंचमुखी अळू : पंचमुखी अळू हे वाण कंद लागवडीनंतर सुमारे १८० ते २०० दिवसांमध्ये काढणीला येते. ज्यातून हेक्टरी २०० ते २५० क्विंटल इतके हेक्टरी उत्पादन मिळते. मुक्ताकेशी : मुक्ताकेशी हे अळू वाण १६० ते १७० दिवसांमध्ये पाने तोडणीला येतात. या वाणापासून तुम्हाला हेक्टरी २०० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळू शकते. आजाद अळू : आजाद अळू हे वाण केवळ १२० दिवसांमध्ये अर्थात ४ महिन्यांमध्ये काढणीला येते. या वाणापासून हेक्टरी २५० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळते.

किती मिळते उत्पादन? साधारणपणे अळूची पाने लागवडीनंतर वाणानुसार चार ते पाच महिन्यात तोडणीला येतात. पूर्ण वाढलेली पाने जमिनीलगत देठासह कापून, गड्ड्या बांधून विक्रीला पाठवावी. पहिल्या वेळी पाने काढल्यानंतर पुन्हा १५ ते १८ दिवसांच्या अंतराने पाने काढणीस तयार होतात. एकदा केलेल्या लागवडीपासून १.५ ते २ वर्षे पाने मिळत राहतात. अळूचे जवळपास ४ ते ५ टन दर हेक्टरी, हिरवी पाने आणि कंदासाठी लागवण्यात येणाऱ्या जातींपासून सुमारे ६ ते ७ टन दर हेक्टरी कंद एवढे उत्पादन मिळते.

अळूचे आयुर्वेदिक गुणधर्म : अळूची पाने ही जीवनसत्व 'अ'चे मुख्य स्रोत आहेत. ज्यामुळे डोळे निरोगी राहण्यास मदत होते. अळूची पानांमध्ये जीवनसत्व 'क' देखील मोठ्या प्रमाणात आढळते. यामुळे कॅन्सरग्रस्त असलेल्या रुग्णांनी अळूचा आहारात समावेश केल्यास त्यांना अनेक फायदे मिळतात. अळूच्या आहारातील समावेशामुळे कर्करोगाच्या, ट्यूमरच्या वाढीस प्रतिबंध होतो. याशिवाय कर्करोगाच्या पेशींच्या प्रसाराची प्रगती कमी होते. इतकेच नाही तर एका अभ्यासानुसार, अळूची पाने नियमित आहारात समाविष्ट केल्याने कोलन कर्करोगाचे प्रमाण कमी होऊ शकते, असे दिसून आले आहे.

## रब्बी हंगामात कोरडवाहू जमिनीत या पिकांचे घ्या उत्पादन

राज्यातील एकूण लागवडीयोग्य जमिनीपैकी ८० टक्के शेती ही पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर म्हणजेच निसर्गावर अवलंबून आहे. या कोरडवाहू (अवर्षण प्रवण) भागातील पावसाचे प्रमाण कमी, अनियमित आणि लहरी असल्यामुळे पीक उत्पादन हे अनिश्चित स्वरूपाचे असते. कोरडवाहू क्षेत्रातील पिकांचे नियोजन करताना उत्पादन वाढीच्या दृष्टीने विविध सुधारित तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे आहे. कोरडवाहू क्षेत्रात उपलब्ध पाण्याचा विचार करून हंगामातील घ्यावयाची पिके, पीक पद्धती, पेरणीची वेळ, बियाणे निवड, बीजप्रक्रिया, खत व्यवस्थापन तसेच ओलाव्याचे नियोजन आदी बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे कोरडवाहू रब्बी हंगामातील पिकांची पेरणीचा ही सप्टेंबरच्या मध्यापासून ऑक्टोबरच्या मध्यापर्यंत करता येते. मात्र यंदाचा विचार करता, बहुतांश भागात सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण झाली होती.

काही ठिकाणी पावसाचे पाणी शेतात साचल्याने रब्बी हंगामाच्या दृष्टीने आवश्यक शेती कामे करणे शक्य झाले नाही. त्यामुळे रब्बी हंगामातील पिकांच्या लागवडी लांबण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी शेताचे पावसाचे पाणी साचून राहिल्यामुळे जमीन लागवडीयोग्य होण्यास विलंब होणार आहे. या बाबींचा विचार करता सद्यःस्थितीत वाफसा येताच जमीन लागवडीयोग्य तयार करून लवकरात लवकर रब्बी पिकांच्या पेरण्या उरकून घेणे आवश्यक आहे.

रब्बी ज्वारीसाठी जमिन आणि वाण : हलकी जमीन - (खोली ३० सें.मी पर्यंत) : फुले अनुराधा, फुले माऊली, फुले यशोमती. मध्यम जमीन - (६० सें.मी. पर्यंत) : फुले सुचित्रा, फुले चित्रा, फुले माऊली, परभणी मोती, मालदांडी ३५-१. भारी जमीन - (६० सें.मी.पेक्षा जास्त) : फुले वसुधा, फुले यशोदा, सीएसव्ही-२२, पीकेव्ही-क्रांती, परभणी मोती, परभणी सुपर. हुरड्यासाठी : फुले मधुर. बियाणे - हेक्टरी १० ते १२ किलो.



पेरणीची योग्य वेळ : १५ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर पेरणीचे अंतर : ४५ सेंमी बाय १५ ते २० सेंमी. खत व्यवस्थापन : शेवटच्या वखरणीच्या वेळी ५ टन शेणखत जमिनीत मिसळावे. पेरणीच्या वेळी नत्र, स्फुरद, पालाश खताची ५०:२५:२५ किलो प्रति हेक्टरी म्हणजे अंदाजे दोन गोणी युरिया, तीन गोण्या एसएसपी व एक गोणी एमओपी खतमात्रा दोन चाड्याच्या पाभरीने द्यावे. पाणी व्यवस्थापन : कोरडवाहू ज्वारीस संरक्षित पाण्याची सोय असल्यास पीक गर्भावस्थेत असताना पेरणीनंतर २८ ते ३० दिवसांनी किंवा पीक पोटरीत असताना ५० ते ५५ दिवसांनी द्यावे. दोन पाणी देणे शक्य असल्यास वरील दोन्ही नाजूक अवस्थेत पिकाला पाणी द्यावे.

करडई : वाण - एसएसएफ ६५८, एसएसएफ ७०८, फुले करडई, फुले चंद्रभागा ,नारी-६, नारी एन एच -१ (बिगर काटेरी वाण). बियाणे : हेक्टरी १० ते १२ किलो. पेरणीची अंतर : ४५ बाय २० सेंमी. खत व्यवस्थापन : शेवटच्या वखरणीच्या वेळी ५ टन शेणखत जमिनीत मिसळावे. नेरणीच्या वेळी नत्र, स्फुरद, पालाश ५०:२५:०० किलो प्रति हेक्टरी. म्हणजे अंदाजे दोन गोणी युरिया व तीन गोण्या एसएसपी दोन चाड्याच्या पाभरीने द्यावे. पाणी व्यवस्थापन : करडई हे पीक अवर्षण प्रतिकारक असल्यामुळे या पिकाच्या वाढीस पाणी कमी लागते. मध्यम ते भारी जमिनीत पुरेसा ओलावा असल्यास करडईच्या पिकास पेरणी नंतर पाणी देण्याची गरज भासत नाही.

सूर्यफूल :वाण - सुधारित वाण : भानू, फुले भास्कर. संकरित : एमएसएफएच-१७, एलएसएफएच -१७१. बियाणे प्रमाण : हेक्टरी ८ ते १० किलो. पेरणीचे अंतर : मध्यम खोल जमीन : ४५ बाय ३० सेंमी, भारी जमीन : ६० ३० से.मी.

खत व्यवस्थापन : शेवटच्या वखरणीच्या वेळी ५ टन शेणखत जमिनीत मिसळावे. पेरणीच्या वेळी नत्र, स्फुरद, पालाश ५०:२५:२५ किलो प्रति हेक्टरी म्हणजे अंदाजे दोन गोणी युरिया, तीन गोण्या एसएसपी व एक गोणी एमओपी दोन चाड्याच्या पाभरीने द्यावे. पाणी व्यवस्थापन : पिकाच्या संवेदनशील अवस्थेत पाणी द्यावे.

हरभरा :लागवडीसाठी वाण - देशी वाण : विजय, दिग्विजय, फुले विश्वराज, फुले विक्रम. काबुली वाण : विराट, कृपा पी.के.व्ही २, पीकेव्ही ४. कम्बाईन हार्वेस्टरने काढणीस योग्य वाण : फुले विक्रम, पीडीकेव्ही कनक.

बियाणे प्रमाण : (प्रति हेक्टरी)- लहान आकार असलेल्या वाणासाठी : ६५ ते ७० किलो. टपोऱ्या दाण्याचे वाण : ८५ ते १०० किलो. जास्त टपोऱ्या दाण्याचे वाण (काबुली): १२५ ते १३० किलो. पेरणी : बागायती : २० ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर पर्यंत पूर्ण करावी, उशिरात उशिरा १५ डिसेंबरपर्यंत बागायती पेरणी करून घ्यावी. पेरणीचे अंतर : देशी वाण : ३० बाय १० सेंमी. काबुली वाण : ४५ बाय १० सेंमी. खत व्यवस्थापन : शेवटच्या वखरणीच्या वेळी ५ टन शेणखत जमिनीत मिसळावे. पेरणीच्या वेळी नत्र, स्फुरद, पालाश २५:५०:३० किलो प्रति हेक्टरी म्हणजे अंदाजे एक गोणी युरिया, सहा गोण्या एसएसपी व एक गोणी एमओपी दोन चाड्याच्या पाभरीने द्यावे. किंवा १२५ किलो डीएपी आणि ५० किलो एमओपी खताची मात्रा पेरणीच्या वेळी बियाणालगत दुचाडी पाभरीने पेरून द्यावे.

जिरायती गहू : वाण निवड - जिरायती वाण : पंचवटी (एनआयडीडब्ल्यू-१५), शरद (एकेडीडब्ल्यू -२९९७-१६). जिरायती व मर्यादित सिंचनाखालील क्षेत्रासाठी : नेत्रावती (एनआयएडब्ल्यू-१४१५), एचडी २९८७ (पुसा बहार). पेरणीचे अंतर : २० सेंमी. बियाणे प्रमाण : हेक्टरी ७५ ते १०० किलो. खत व्यवस्थापन : नत्र ४०किलो (युरिया ८७ किलो) आणि स्फुरद २० किलो (एसएसपी १२५ किलो). पाणी व्यवस्थापन : जिरायती गहू पिकाची वाढ ही जमिनीतील उपलब्ध ओलाव्यावर होते. एक पाण्याची उपलब्धता असल्यास पेरणीनंतर ४० ते ४२ दिवसांनी सिंचन करावे.

## दिन विशेष

**जागतिक दिवस:**
आंतरराष्ट्रीय ओझोन दिन
मेक्सिकोचा स्वातंत्र्यदिन

### महत्वाच्या घटना

१६२० : 'मेफ्लॉवर' जहाजाने साउदॅम्पटन बंदरातुन उत्तर अमेरिकेकडे प्रयाण केले.
१८२१ : मैक्सिकोच्या स्वातंत्रतेला मान्यता देण्यात आली होती.
१८६१ : ब्रिटन देशांतील पोस्ट ऑफिस मध्ये बचत खाता उघडण्यास सुरुवात झाली.
१९०८ : 'जनरल मोटर्स कॉर्पोरेशन' या कंपनीची स्थापना झाली.
१९३५ : इंडियन कंपनीज ॲक्ट अन्वये 'बँक ऑफ महाराष्ट्र'ची नोंदणी करण्यात आली.
१९४५ : दुसरे महायुद्ध हाँगकाँगमधील जपानी सैन्याने रॉयल नेव्हीसमोर शरणागती पत्करली
१९६३ : झेरॉक्स ९१४ या प्रतिमुद्रक यंत्राचे पहिले प्रात्यक्षिक.
१९६७ : सोव्हियत संघाने पूर्व कजाख मध्ये आण्विक चाचणी केली.
१९७५ : पापुआ न्यू गिनी या देशाला (ऑस्ट्रेलियापासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९८७ : ओझोनच्या थराच्या कमीत कमी संरक्षण करण्यासाठी मॉन्ट्रियल प्रोटोकॉलवर स्वाक्षरी केली आहे.
१९९७ : आय. टी. सी. आंतरराष्ट्रीय मैदानी स्पर्धेत राजीव बालकृष्णन याने शंभर मीटर धावण्याच्या शर्यतीत १०.५० सेकंद वेळ नोंदवून राष्ट्रीय विक्रम केला.
१९९७ : संस्कृत भाषेसंदर्भात प्रशंसनीय कार्य केल्याबद्दल मुंबई येथील मराठा मंदिर संस्थेच्या वरळी हायस्कूलमधील संस्कृतचे निवृत्त शिक्षक पं. गुलाम दस्तगीर अब्बासअली बिराजदार यांना 'राष्ट्रीय संस्कृत पंडित' हा राष्ट्रपतींकडून दिला जाणारा पुरस्कार जाहीर
२००८ : भारतीय हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेड (भेल) च्या कर्मचाऱ्यांना विश्वकर्मा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१३८० : चार्ल्स (सहावा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: २१ आक्टोबर १४२२)
१३८६ : हेन्री (पाचवा) इंग्लंडचा राजा (मृत्यू: ३१ ऑगस्ट १४२२)
१८५३ : नोबेल पारितोषिक विजेते जर्मन डॉक्टर आल्ब्रेख्त कॉसेल यांचा जन्म.
१८८८ : बेंटले मोटर्स लिमिटेड चे डब्ल्यू ओ. बेंटले यांचा जन्म. (मृत्यू: १३ ऑगस्ट १९७१)
१९०७ : वामनराव सडोलीकर भारतीय हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या जयपूर-अत्रोली घराण्यातील प्रसिद्ध शास्त्रीय गायक (मृत्यू: २५ मार्च १९९१)
१९१३ : कमलाबाई कृष्णाजी ओगले 'रुचिरा' या पाकशास्त्रावरील प्रचंड खपाच्या पुस्तकाच्या लेखिका (मृत्यू: २० एप्रिल १९९९)
१९१६ : एम. एस. सुब्बुलक्ष्मी भारतरत्न, पद्मभूषण, पद्म विभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय शास्त्रीय कर्नाटकी गायक (मृत्यू: ११ डिसेंबर २००४)
१९२३ : सिंगापूरचे पहिले पंतप्रधान ली कुआन यी यांचा जन्म. (मृत्यू: २३ मार्च २०१५)
१९२५ : आयर्लंडचे पंतप्रधान चार्ल्स हॉगे यांचा जन्म.
१९३१ : भारतीय क्रिकेट पंच आर. रामचंद्र राव यांचा जन्मदिन.
१९४२ : नामदेव धोंडो तथा 'ना. धों' महानोर निसर्ग कवी व प्रयोगशील शेतकरी, त्यांना 'पानझड' या कवितासंग्रहासाठी साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे. १९ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.
१९५४ : संजय बंदोपाध्याय भारतातील बंगाली हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील प्रख्यात सितार वादक
१९५६ : डेव्हिड कॉपरफिल्ड अमेरिकन जादूगार
१९७१ : भारतीय हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध गीतकार, पटकथा लेखक व कवी प्रसून जोशी यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६८१ : मुघल शासक दारा शिकोह आणि सम्राट औरंगजेब यांची मोठी बहीण जहाँनारा बेग़म यांचे निधन.
१७३६ : डॅनियल फॅरनहाइट जर्मन शास्त्रज्ञ (जन्म: २४ मे १६८६)
१८२४ : लुई (अठरावा) फ्रान्सचा राजा (जन्म: १७ नोव्हेंबर १७५५)
१९३२ : सर रोनाल्ड रॉस हिवतापाच्या जंतुंचा शोध लावल्याबद्दल नोबेल पारितोषिक मिळवणारे (१९०२) ब्रिटिश डॉक्टर (जन्म: १३ मे १८५७ आल्मोडा, उत्तराखंड)
१९४४ : भारतीय अभियंता व काशी हिंदू महाविद्यालयाचे माजी उप कुलगुरू ज्वालाप्रसाद यांचे निधन.
१९६५ : फ्रेड क्मिम्बी अमेरिकन ॲनिमेशनपट निर्माते (जन्म: ३१ जुलै १८८६)
१९६५ : परमवीर चक्र पुरस्कार विजेता भारतीय सैन्य अधिकारी लेफ्टनंट कर्नल ए.बी. तारापोर यांचे निधन.
१९७३ : पुण्यातील जुन्या पिढीतील सरदार, पर्वती संस्थानचे विश्वस्त, संगीतज्ञ, इतिहासाचे अभ्यासक गंगाधरराव नारायणराव तथा आबासाहेब मुजुमदार यांचे निधन. त्यांचे मूळ नाव श्रीधर पांडुरंग प्रभुणे होते. मुजुमदारांकडे ते दत्तक गेले. पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाचे ते चोवीस वर्षे चिटणीस होते.
१९७७ : केसरबाई केरकर साहित्य नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित जयपूर-अतरौली घराण्याच्या भारतीय शास्त्रीय गायिका (जन्म: १३ जुलै १८९२)
१९८४ : बिकीनि चे निर्माते लुई रायर्ड यांचे निधन. (जन्म: १६ सप्टेंबर १९८४)
१९९४ : जयवंत दळवी साहित्यिक, नाटककार व पत्रकार. कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, विनोदी लेख असे विविध प्रकार त्यांनी हाताळले. ते 'ठणठणपाळ' या टोपणनावाने विनोदी व मार्मिक लेखन करीत. (जन्म: १४ ऑगस्ट १९२५)
२००५ : लेसर चे शोधक गॉर्डन गूल्ड यांचे निधन. (जन्म: १७ जुलै १९२०)
२०१२ : आयमॅक्स चे सहसंस्थापक रोमन कोरियटर यांचे निधन. (जन्म: १२ डिसेंबर १९२६)
२०१७ : पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय वायुदलाचे वरिष्ठ अधिकारी मार्शल अर्जन सिंह यांचे निधन.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# जिल्हा परिषद मतदारसंघाच्या आरक्षणासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात सोडत

जालना। प्रतिनिधी

जालना जिल्हा परिषदेसाठी गटनिहाय आरक्षणाची सोडत जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात काढण्यात आली. जिल्हा परिषदेचे तालुकानिहाय गटामध्ये आरक्षण निश्चित करण्यात आले. यामध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग १५, सर्वसाधारण ३३, अनुसूचित जाती ८, अनुसूचित जमाती १ असे गटनिहाय आरक्षण निश्चित झाले. तसेच पंचायत समितीच्या सभापतीपदासाठी देखील आरक्षण सोडत पार पडली. यावेळी अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) नम्रता चाटे, नायब तहसिलदार तुषार निकम यांच्यासह जिल्ह्यातील ग्रामस्थांची उपस्थिती होती. जिल्हा परिषद मतदारसंघासाठी झालेल्या गट निहाय आरक्षण खालील प्रमाणे आहेत.




भोकरदन तालुक्यातील गट : वालसावंगी नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), पारध बु. – नागरिकांचा मागास प्रवर्ग, जळगाव सपकाळ – अनुसूचित जमाती (महिला), आन्वा – सर्वसाधारण (महिला), वालसा वडळा – सर्वसाधारण, आव्हाना – नागरिकांचा मागास प्रवर्ग, सोयगाव देवी – सर्वसाधारण (महिला), नळणी बू.–सर्वसाधारण, हसनाबाद–नागरिकांचा मागास प्रवर्ग, चांदई ठोंबरी – सर्वसाधरण (महिला), राजूर – अनुसूचित जाती (महिला).

जाफ्राबाद तालुक्यातील गट : वरूड बू.– नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), माहोरा – नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), जवखेडा ठेंग – अनुसूचित जाती (महिला), सिपोरा अंभोरा – अनुसूचित जाती (महिला), टेंभूर्णी – नागरिकांचा मागास प्रवर्ग, अकोला देव – नागरिकांचा मागास प्रवर्ग.

बदनापूर तालुक्यातील गट : दाभाडी – सर्वसाधारण (महिला), बावणे पांगरी – अनुसूचित जाती, गेवराई बाजार – नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), शेलगाव अनुसूचित जाती, रोषनगाव सर्वसाधारण (महिला).

जालना तालुक्यातील गट : वाघ्रुळ जहाँगीर अनुसूचित जाती, पीरकल्याण सर्वसाधारण (महिला), मोजपूरी सर्वसाधारण, शेवली – अनुसूचित जाती, नेर सर्वसाधारण, रामनगर सर्वसाधारण (महिला), देवमुर्ती नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), रेवगाव अनुसूचित जाती (महिला), भाटेपूरी सर्वसाधारण.


मंठा तालुक्यातील गट : तळणी सर्वसाधारण, खोराड सावंगी सर्वसाधारण, जयपूर सर्वसाधारण, हेलस सर्वसाधारण, पांगरी गोसावी सर्वसाधारण (महिला), केंधळी नागरिकांचा मागास प्रवर्?

परतूर तालुक्यातील गट : वाटूर सर्वसाधारण, सातोना खुर्द सर्वसाधारण (महिला), पाटोदा माव नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), आष्टी सर्वसाधारण (महिला), कोकाटे हदगाव सर्वसाधारण (महिला).

घनसावंगी तालुक्यातील गट : राणीउंचेगाव सर्वसाधारण, रांजणी सर्वसाधारण, गुरुपिंपरी सर्वसाधारण, मच्छिंद्रनाथ चिंचोली सर्वसाधारण, कुंभारपिंपळगाव – सर्वसाधारण (महिला), अंतरवाली टेंभी सर्वसाधारण (महिला), राजाटाकळी सर्वसाधारण (महिला)

अंबड : रोहिलागड नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), पारनेर सर्वसाधारण (महिला), जामखेड नागरिकांचा मागास प्रवर्ग, ताडहादगाव सर्वसाधारण, धाकलगाव सर्वसाधारण (महिला), साष्टपिंपळगाव सर्वसाधारण, गोंदी सर्वसाधारण, शहागड सर्वसाधारण.

## कर्मचाऱ्यांसाठी दंत तपासणी शिबिर



जालना । प्रतिनिधी

सुदृढ दात म्हणजे सुदृढ आरोग्याचा पाया. असून विविध आरोग्य शिबिरामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता वाढत असल्याचे मत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम. यांनी केले आहे.

जिल्हा परिषदेच्या स्व.यशवंतराव चव्हाण सभागृहात डॉ. भताने'ज छाया फाऊंडेशन आणि छाया डेंटल क्लिनिक, जालना यांच्या वतीने जिल्हा परिषदेतील अधिकारी व कर्मचारी वर्गासाठी मोफत दंत तपासणी व मार्गदर्शन शिबीर संपन्न झाले यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी अति. मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, सुनीलकुमार पठारे प्रकल्प संचालक ,उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र तुबाकले,उपायुक्त तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रशांत चौधरी , वैभव ढवळे यांची प्रमुख उपस्थित होती . या शिबिरात डॉ. गोविंद भताने, डॉ. किरण अंभोरे आणि त्यांच्या तज्ज्ञ टीमने सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांची दंत तपासणी करून दंत विषयक आजार टाळण्यासाठी काय काय उपाय केले पाहिजेत तसेच काय दक्षता घ्यावी याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी रूट कॅनॉल ट्रीटमेंटच्या आधुनिक पद्धती, इंप्लांट व अत्याधुनिक दंत प्रत्यारोपण तंत्रज्ञान, दात स्वच्छता (स्केलिंग) व त्याचे महत्त्व,तंबाखू व गुटखा सेवनामुळे होणारे तोंडाचे दुष्परिणाम व सवय सोडवण्यासाठी मार्गदर्शन,दंत आरोग्य, तोंडाची स्वच्छता व दातांच्या देखभालीबाबत जनजागृती तसेच, ज्यांना पुढील उपचाराची आवश्यकता आहे त्यांच्यासाठी योग्य ती वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यावेळी जिल्हा परिषदेतील महिला व पुरुष अधिकारी कर्मचारी यांची मोठ्या प्रमाणावर तपासणी करून उपचार करण्यात आले.

## माऊली अर्बन पतसंस्था दीपस्तंभ पुरस्काराने सन्मानित



मंठा । प्रतिनिधी

संचालकांचे मार्गदर्शन, कर्मचाऱ्यांची मेहनत आणि सभासदांच्या सहकार्यामुळे यावर्षीचा मानाचा दीपस्तंभ पुरस्कार मंठा येथील माऊली अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीला मिळाला आहे.कर्नाटक राज्यातील दक्षिण काशी गोकर्णधाम येथील डेनिसन्स रिसॉर्टमध्ये महाराष्ट्र पतसंस्था फेडरेशनच्या वतीने आयोजित सोहळ्यात महाराष्ट्र पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती लवांडे मॅडम, माजी आमदार श्री बोन्द्रे, कर्नाटक पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष तसेच संचालक डॉ. संजय होसमठ यांच्या हस्ते हा मानाचा पुरस्कार संस्थेचे अध्यक्ष सतीशराव निर्वळ यांनी स्वीकारला. यावेळी गजानन निर्वळ, अमोल मस्के, कालिदास निर्वळ, रवि चव्हाण उपस्थित होते.माऊली अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि. मंठा या संस्थेस औरंगाबाद विभागातील गट क्र. २ मधून तृतीय क्रमांकाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## सरन्यायाधीशांवरील हल्ला; संभाजीनगरात वकील संघाचे काम बंद आंदोलन

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ जिल्हा वकील संघ, मराठवाडा लेबर लॉ प्रॅक्टिशनर्स असोसिएशन आणि इंडस्ट्रियल असोसिएशन ऑफ लायर्स यांच्या वतीने शहरातील सर्व न्यायालयांमध्ये काम बंद आंदोलन करण्यात आले.

सरन्यायाधीश गवई यांच्यावरील हल्ल्याच्या निषेधार्थ काम बंद ठेवणार असल्याचे जिल्हा वकील संघाने जिल्हा व सत्र न्यायाधीशांना तसेच अन्य संघटनांनी औद्योगिक न्यायालय सदस्यांना या आंदोलनाबाबत कळविले होते. त्यामुळे जिल्हा न्यायालय, कामगार व औद्योगिक न्यायालयाचे कामकाज सोमवारी दिवसभर पूर्णपणे बंद राहिले. न्यायालय परिसरात आयोजित निषेध सभेत वकिलांनी हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध नोंदविला. यावेळी वकिलांनी म्हटले की, सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर हल्ला हा केवळ व्यक्तीवर नाही, तर संपूर्ण न्यायव्यवस्थेवर आणि संविधानावर हल्ला आहे. अशा कृत्यांना माफ केल्यास भविष्यात आणखी असे प्रकार घडू शकतात, त्यामुळे आरोपीवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी सभेतून करण्यात आली. बार कौन्सिल ऑफ इंडियाने संबंधित वकिलाची सनद निलंबित केल्याबद्दल समाधानही व्यक्त करण्यात आले. या निषेध सभेत जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. अशोक मुळे, सेक्रेटरी ॲड. योगेश तुपे, ॲड. अमोल घोडेगाव, लेबर लॉ असोसिएशनचे सेक्रेटरी ॲड. अभय टाकसाळ, उपाध्यक्ष ॲड. अनिल सुरवसे, कोषाध्यक्ष ॲड. राजेश खंडेलवाल, इंडस्ट्रियल असोसिएशनचे सेक्रेटरी ॲड. विनोद पवार, ॲड. आनंद चावरे तसेच ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सोमनाथ लड्डा, ॲड. के.सी. डोंगरे, ॲड. राजेंद्र मुगदिया यांच्यासह मोठ्या संख्येने वकिल उपस्थित होते.

## बीडच्या महाएल्गार सभेला शिवा संघटनेचा जाहीर पाठिंबा'

### ओबीसी समाजाच्या महाएल्गार सभेत हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे' – प्रा.मनोहर धोंडे

लातूर । प्रतिनिधी

शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या वतीने ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी राज्यभर ठिक-ठिकाणी होणाऱ्या आंदोलनात सक्रिय सहभाग घेवुन लढा उभारला जात आहे. त्याचाच भाग म्हणून दि.०२ सप्टेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र शासनाच्या वतीने काढण्यात आलेल्या ओबीसीवर अन्याय करणारा शासन निर्णयाविरोधात दि. ०८.०९.२०२५ रोजी मुंबई उच्च न्यायालयात शिवा संघटनेच्या वतीने पहीली याचिका दाखल केली आहे. एवढेच नाहीतर ज्या आझाद मैदानावर २ सप्टेबरचा जी.आर देण्यात आला त्याच आझाद मैदानावर अन्याय करणारा जी. आर रद्द करण्यासाठी शिवा संघटनेच्या वतीने दि. ०७ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रचंड धरणे आंदोलन करण्यात आले.

याच धरणे आंदोलनाच्या व्यासपीठावरुन ओबीसीचे संघर्ष योध्दे व मंत्री मा. ना. छगनराव भुजबळ यांनी पावसामुळे रद्द झालेल्या बीड येथील ओबीसीच्या महाएल्गार सभेची घोषणा केली दि. १७ ऑक्टोबरला ही महाएल्गार सभा ओबीसी नेते मा. ना. छगनराव भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली घेण्याचे जाहीर केले आहे.

या महाएल्गार सभेला शिवा संघटनेसह मराठवाडयातील संपूर्ण ओबीसी समाजाचा जाहीर पाठिंबा आहे. तरी मराठवाडयातील शिवा संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व वीरशैव लिंगायत समाजबांधवासह संपुर्ण ओबीसी समाजबांधवानी शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ४.०० वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण, छत्रपती शिवाजी महाराज चौक बीड येथे हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष आणि राष्ट्रीय ओबीसी आरक्षण हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांनी केले आहे.

## ज्यांनी साथ सोडली त्यांना शुभेच्छा! मी राष्ट्रवादीतच राहणार

### सुरेश नागरे यांचा पक्ष सोडलेल्या कावळ्यांना टोला

परभणी । प्रतिनिधी

ज्यांनी मला सोडले, त्यांना माझ्या शुभेच्छा आहेत. सत्तेत सहभागी व्हायचे असल्याने ते भाजपमध्ये गेले. मात्र, मी अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी पक्षातच राहणार आहे. राष्ट्रवादी पक्ष हा सर्व जाती-धर्मांना एकत्र घेऊन जाणारा पक्ष आहे. आगामी निवडणुकांमध्ये मी आणि माजी आमदार विजय भांबळे एकदिलाने काम करून पक्ष मजबूत करू, असा विश्वास युवा नेते सुरेश नागरे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.



ते पुढे म्हणाले की, मी अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातच राहणार असून भाजपमध्ये जाण्याचा प्रश्नच नाही. अलीकडेच नागरे यांचे खंदे समर्थक आणि ओबीसी नेते माजी जिल्हा परिषद सदस्य नाना राऊत, राजेंद्र नागरे, अविनाश काळे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. मुंबईत भाजप प्रदेशाध्यक्ष चव्हाण, माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर आणि पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या उपस्थितीत या नेत्यांनी भाजपचा झेंडा हाती घेतला. या प्रवेशामुळे जिंतूर मतदारसंघात राजकीय चर्चांना उधाण आले आहे. या पार्श्वभूमीवर सुरेश नागरे यांनी पत्रकार परिषद घेऊन प्रतिक्रिया दिली. या पत्रकार परिषदेत सुरेश नागरे यांच्यासोबत त्यांची पत्नी अमृता नागरे, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे तालुकाध्यक्ष लक्ष्मणराव बुधवंत, केशव बुधवंत, बासुखा पठाण यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, नुकत्याच झालेल्या बैठकीत माजी आमदार विजय भांबळे आणि सुरेश नागरे यांनीही स्पष्ट संकेत दिले की, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जिंतूर तालुक्यात भाजप विरुद्ध अजित पवार गट (राष्ट्रवादी) अशी थेट लढत पाहायला मिळणार आहे.

## जनजागरण व्हिडियो व्हॅनच लोकाअर्पण पोलीस महानिरीक्षक मिश्र यांच्या हस्ते

जालना। प्रतिनिधी

मा. विशेष पोलीस महानिरिक्षक, वीरेंद्र मिश्र यांनी आज जालना येथे पोलीस प्रशासन विभागाची आज बैठक घेण्यात आली आज दिनांक १४.१०.२०२५ रोजी मा.श्री. विरेंद्र मिश्र विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र यांनी जालना जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी तसेच सर्व शाखा प्रमुख यांची पोलीस अधीक्षक कार्यालय जालना येथे गुन्हे आढावा परिषद घेतली. सर्वप्रथम सदर परिषदेमध्ये मा. विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या हस्ते कम्युनिटी पोलीसींगकरिता जनजागरण व्हिडीयो व्हॅनचे लोकार्पन करण्यात आले. त्यांनतर माहे ०९/२०२५ मध्ये उल्लेखनिय कामगीरी करणाऱ्या पोलीस अधिकारी अंमलदार यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. सदर गुन्हे परिषदेमध्ये खुन, खुनाचा प्रयत्न, दरोडा, जबरी चोरी, घरफोडी, मोटारसायकल चोरी, चारचाकी चोरी व इतर प्रलंबित गुन्हयांचा आढावा घेऊन सदरील गुन्हे लवकरात लवकर निकाली काढण्यासंदर्भाने महत्वाच्या सुचना दिल्या. तसेच अंमली पदार्थ विरोधी पथक जालना यांच्या कामकाजाचा आढावा घेऊन त्यांनी केलेल्या कारवाई बद्दल त्यांना प्रशस्तीपत्र देऊन अभिनंदन केले. तसेच सर्व प्रभारी अधिकारी यांनी पुढील काळात जास्तीत जास्त अमली पदार्थाबाबत जास्तीत जास्त दर्जेदार कारवाया करण्याच्या सुचना दिल्या. उपविभागीय पोलीस अधिकारी व प्रभारी अधिकारी यांनी जास्तीत जास्त गावभेटी द्याव्यात व प्रत्येक गावात सिसिटीव्ही कॅमेरा लावणे बाबत जनजागृती करावी व नविन कायद्याची अंमलबजावणी करुन दोषसिध्दीचे प्रमाण वाढविणेबाबत सुचना दिल्या आहेत. तसेच सर्व पोलीस अधीकारी व पोलीस अंमलदार यांनी आरक्षण, मोर्चे, गणपती बंदोबस्त व नवरात्री उत्सव बंदोबस्त चांगल्याप्रकारे केल्याने त्यांचे अभिनंदन केले.




मा. विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या गुन्हे आढावा परिषदेमध्ये मा. अजयकुमार बंसल पोलीस अधीक्षक जालना, मा. आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक जालना तसेच जिल्हयातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व सर्व शाखा प्रमुख हे पोलीस अधीक्षक कार्यालय जालना येथे हजर होते.

जाहिर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.५४३/२०२५**
**शेख आलिप लालू विरुद्ध**
**ग्रामपंचायत कार्यालय लोणीघाट**

पहा
शेख आलिप लालू रा. लोणीघाट ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक शेख आलिप लालू यांचा दिनांक ०९/०७/२००६ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहू येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस लोणीघाट ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे लोणीघाट ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक १३/१०/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १३/१०/२०२५ ही आहे


**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

## कळंब नगरपालिकेतील मतदारयाद्यांमध्ये बोगस मतदार

### माजी नगराध्यक्ष संजय मुंदडा यांचा पुराव्यासह आरोप

धाराशीव । प्रतिनिधी

कळंब नगरपालिकेच्या आगामी निवडणुकीतील मतदार यादीतील बोगस नावे पद्धतशीरपणे विशिष्ट यंत्रणेमार्फत समाविष्ट केली असल्याचा गंभीर आरोप माजी नगराध्यक्ष संजय मुंदडा यांनी पत्रकार परिषद घेऊन केला आहे. त्यामुळे शहरात खळबळ उडाली असून थेट प्रशासनावरच निवडणूक प्रक्रियेत फेरफार केल्याचा धक्कादायक आरोप केला आहे. ''एका विशिष्ट राजकीय पक्षाला जिंकवण्यासाठी बाह्य आणि बनावट मतदारांची पद्धतशीर नोंदणी करण्यात आली आहे, असा गंभीर दावा करत त्यांनी संपूर्ण यंत्रणेच्याच कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत.



पत्रकार परिषदेत बोलताना मुंदडा यांनी सांगितले की, नगरपालिकेने प्रसिद्ध केलेल्या प्रारूप मतदार याद्यांमध्ये २००० हून अधिक मतदारांची नावे बदलून इतर प्रभागात टाकण्यात आली आहेत. हे नेमके कोणाच्या दबावाखाली करण्यात आले? प्रशासन लोकशाहीची थट्टा करत आहे का? असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला. मतदार याद्या तयार करताना निवडणूक आयोगाच्या नावाखाली मनमानी सुरू असून, प्रशासन विशिष्ट 'यंत्रणे'च्या इशाऱ्यावर काम करत असल्याचा थेट आरोप मुंदडा यांनी केला. यावेळी नंदकिशोर हौसलमल, गोविंद चौधरी, शंकर वाघमारे आदी उपस्थित होते.

मतदार याद्यांवर हरकती व आक्षेप नोंदवण्यासाठी खलम सहा अंतर्गत दोन नियम आहेत १) स्वतः मतदाराचा अर्ज २) इतरांनी केलेला आक्षेप. पण मुख्याधिकारी मंजुषा गुरमे आणि निवडणूक विभागातील काकडे यांनी दुसरा नियम पायदळी तुडवत स्वतः या आणि हरकती नोंदवा असा अजब नियम राबवला असल्याची टीका मुंदडा यांनी केली.

मुंदडा म्हणाले, जर बोगस नावे आणि फेरफार केलेले मतदार तातडीने वगळले नाहीत, तर आम्ही थेट न्यायालयात दाद मागणार असल्याचे मुंदडा यांनी सांगितले.

## हिंगोलीकरांना तीन दिवस पाणी पुरवठा बंद

### नॉन रिटर्न वॉल दुरूस्तीचे काम सुरू

हिंगोली । प्रतिनिधी

शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या पाणी योजनेचा नॉन रिटर्न वॉल नादुरस्त झाल्यामुळे शहराला सोमवारपासून तीन दिवस निर्जळीचा सामना करावा लागणार आहे. दुरुस्तीचे काम युध्दपातळीवर सुरु करण्यात आले असून नागरीकांनी पाण्याचा जपून वापर करण्याचे आवाहन पालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

शहराला सिध्देश्वर धरणावरून पाणी पुरवठा केला जातो. शहरातील सर्व सतरा प्रभागांमधून योग्य दाबाने व नियमितपणे पाणी पुरवठा होण्यासाठी पालिका प्रशासनाकडून दक्षता घेतली जाते. प्रत्येक प्रभागात रोटेशननुसार मुबलक पाणी पुरवठा केला जातो. दरम्यान, हिंगोली शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या सिध्देश्वर धरणाजवळील पाणी पुरवठा योजनेचा नॉन रिटर्नवॉल नादुरुस्त झाले आहे. त्यामुळे पाण्याची गळती वाढली असून शहरातील जलकुंभ भरण्यासाठी मोठा कालावधी लागत आहे.

त्यातून पाणी योजनेच्या विद्युतपंप नादुरुस्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सोमवारी सदर प्रकार लक्षात आल्यानंतर पालिकेचे मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांच्या सुचनेवरून पालिकेचे अभियंता भुरके, नगर अभियंता प्रतिक नाईक, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, यांच्यासह पालिकेचे पथक आज दुपारीच तातडीने सिध्देश्वर येथे रवाना झाले असून पालिकेच्या पथकाकडून दुरुस्तीचे काम युध्दपातळीवर हाती घेण्यात आले आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
बुधवार दि. १५ ऑक्टोबर २०२५ | ६

# माजलगावमध्ये विद्यार्थ्यांच्या संपूर्ण शैक्षणिक शुल्क माफीसाठी एसएफआय-डीवायएफआयचे आंदोलन

**माजलगाव | प्रतिनिधी**

**स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय), डेमोक्रॅटीक युथ फेडरेशन ऑफ इंडिया (डीवायएफआय) आणि अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या वतीने माजलगावमध्ये तीव्र निदर्शने आंदोलन करण्यात आले. अतिवृष्टीग्रस्त विद्यार्थ्यांचे संपूर्ण शैक्षणिक शुल्क माफ करण्यात यावे यांसह इतरही मागण्या यात करण्यात आल्या. शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे ही निदर्शने झाली.**

आंदोलनानंतर मुख्यमंत्री यांना तहसीलदार यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, मागच्या सप्टेंबर महिन्यात महाराष्ट्रात अनेक ठिकाणी अतिवृष्टी झाली. त्यामुळे शेती आणि शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. विशेषतः मराठवाड्यात अतिवृष्टीचे प्रमाण अधिक आहे. शेतातले पीक आणि माती वाहून गेली आहे. शेतकऱ्यांच्या हातात आलेलं सगळंच निसटून गेलं आहे. अशा परिस्थितीत शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्याची ही वेळ आहे. या परिस्थितीचा फटका विद्यार्थ्यांना सुद्धा बसला आहे. अतिवृष्टी झालेल्या भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक खर्च भागविणे अडचणीचे झाले आहे. अतिवृष्टी झालेल्या भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना अनेक अडचणी येत आहेत. शिक्षण शुल्क, निवास आणि भोजन खर्च यांसह इतर खर्च करणे अवघड बनले आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत शासनाने विद्यार्थ्यांना दिलासा देणे आवश्यक आहे.

म्हणून आज राज्यातील वेगवेगळ्या ठिकाणी एसएफआय, डीवायएफआय आणि जनवादी महिला संघटनेच्या वतीने संयुक्त आंदोलन करण्यात आले. माजलगावमध्ये झालेल्या आंदोलनातल्या घोषणाबाजीमुळे डॉ. आंबेडकर चौकात नागरिकांचे लक्ष वेधले गेले होते.

या आंदोलनात एसएफआयचे राज्य रोहिदास जाधव, डीवायएफआयचे राज्य उपाध्यक्ष मोहन जाधव, जिल्हाध्यक्ष सुहास झोडगे, पवन चिंचाणे, संतोष जाधव, बाबा सर, फारुख सय्यद, एकनाथ सक्राते, यशवंत सक्राते, हर्षद डाके, संदीप इंगळे, चंद्रकांत गाते, राज अर्जुन, महेबुब शेख, मस्तकीम शेख, अब्दुल शेख, रुपेश चव्हाण, शेषराव आबुज, विकास झोडगे, अक्षय झोडगे, नितीन पवार, कृष्णा उबाळे, महादेव इंगळे, आकाश जाधव, अशोक पांचाळ, यांच्यासह विद्यार्थी, युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### आंदोलनातील प्रमुख मागण्या

१) अतिवृष्टी झालेल्या भागातील विद्यार्थ्यांचे संपूर्ण शैक्षणिक शुल्क माफ करण्यात यावे. २) अतिवृष्टीत पडझळ झालेल्या शाळांची त्वरित दुरुस्ती करण्यात यावी. ३) युवकांच्या रोजगारासाठी सर्व रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु करावी, कंत्राटी पद्धती बंद करावी. ४) एमपीएससी सह इतर सर्व स्पर्धा परीक्षांची फी माफ करावी. करिता निवेदन सादर. ५) शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करून ओला दुष्काळ जाहीर करावा.




## आ.संदीप क्षीरसागरांकडून अतिवृष्टीच्या नुकसानीचा अहवाल अजितदादांकडे सादर

बीड | प्रतिनिधी

मागील काही दिवसांपूर्वी बीड मतदार संघात झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा पालकमंत्री मा.अजित पवार यांना आ.संदीप क्षीरसागरांनी भेट घेऊन अहवाल सादर केला.आ.संदीप क्षीरसागर यांनी दि.१४ (मंगळवार) रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांची भेट घेत अतिवृष्टीच्या नुकसानीचा अहवाल सादर करत विविध मागण्यांचे पत्र दिले. यामध्ये भूस्खलनाच्या धोक्यामुळे कपिलधारवाडी येथे माळीण गावासारखी दुर्घटना होण्याची शक्यता असून या गावाचे पुनर्वसन करण्याची मागणी केली. तसेच अतिवृष्टीमुळे सर्वाधिक नुकसान झालेल्या आणि पुढील काळात देखील संभाव्य धोका असलेल्या हिंगणी खुर्द गावाचे स्थलांतर करण्याची मागणी देखील आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. ◀◀ पान २ वर


मतदार संघातील विविध मागण्यांचे दिले पत्र

## श्री तुळजा भवानी मंदिर देवस्थानच्या वतीने पूरग्रस्त शेतकऱ्यांना ४०० मदत किटचे वाटप!

### देवस्थानच्या विश्वस्त मंडळाचे मन:पूर्वक आभार-अनिल जगताप

बीड | प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या भीषण पूरस्थितीत शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या अडचणीत सापडले आहेत. या कठीण प्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या नियोजनाखाली श्री तुळजाभवानी मंदिर देवस्थान, नाशिक यांच्या वतीने पूरग्रस्तांना दिलासा देण्यात आला. काल दि. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११. ०० वाजता सिंदफणा नदीकाठी वसलेल्या तांदळवाडी व आहेर चिंचोली या गावांमध्ये देवस्थानाकडून पूरग्रस्त नागरिकांना ४०० किराणा मदत किटचे वाटप करण्यात ◀◀ पान २ वर



## ॲड. चंद्रकांत नवले यांची शिवसेना जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती



बीड | प्रतिनिधी

आज शिवसेना पक्षाचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री मा एकनाथरावशिंदे यांच्या आदेशानुसार ड. चंद्रकांत नवले यांची गेवराई कार्यक्षेत्रासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख म्हणून नेमणूक करण्यात आली. ड.चंद्रकांत नवले हे मूळचे शिवसैनिक असून त्यांना पक्ष संघटनेचा मोठा अनुभव आहे. त्यांनी हिंदुत्वाचा विचार आणि हिंदूहृदय सम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे विचार घराघरात पोहोचविण्यासाठी स्वतः सामना या वृत्तपत्राचे शहरात तसेच खेड्यापाड्यापर्यंत वाटप केले तद्नंतर माजी मंत्री प्रा. सुरेश (आण्णा) नवले यांच्या कुशल अशा मार्गदर्शनाखाली त्यांनी १९९५-१९९९ कार्यकाळात शिवसेना जिल्हाप्रमुख म्हणून काम करताना शिवसेना पक्ष फक्त शहरापुरता मर्यादित न ठेवता बीड जिल्ह्यातील प्रत्येक गाव, वाडी, तांडा, वस्ती व पाड्यापर्यंत पोहोचून व शिवसेनेच्या शाखा स्थापन करून आणि संघटनेतील सर्व पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन शिवसेना पक्षाची जिल्हाभर ताकद निर्माण केली होती.

या आणि अशा सर्व बाबींचा ◀◀ पान २ वर

## सहकारातून समृद्धी या विषयावर जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा संपन्न



बीड | प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पुणे अंतर्गत बीड जिल्हा सहकारी बोर्ड व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांच्या संयुक्त विद्यमाने सहकारातून समृद्धी या विषयावर जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा आय सी हॉल केस के महाविद्यालय बीड या ठिकाणी माननीय सतीश तोटावार साहेब जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांच्या हस्ते वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन झाले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीड जिल्हा ◀◀ पान २ वर

## योगेश्वरी पॉलीटेक्निकमध्ये विशेष व्याख्यान

अंबाजोगाई | प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित, कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निक मध्ये ऑटोमोबाईल व मेकॅनिकल इंजिनिअरिंग अभ्यासक्रमात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रिसेंट ट्रेंड इन मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विषयावर विशेष व्याख्यान झाले. व्याख्यानासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध उद्योजक तसेच सोसायटी ऑफ ऑटोमोबाईल इंजिनिअरिंगचे सचिव केशव ताम्हणकर होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर हे होते.

ताम्हणकर सरांनी व्याख्यानात आजच्या तंत्रज्ञानप्रधान जगात यंत्र अभियांत्रिकीचे महत्त्व स्पष्ट केले. यंत्र अभियांत्रिकी ही शाखा जवळपास सर्वच उद्योगांच्या पायावर उभी आहे मग ते वाहननिर्मिती असो, अंतराळ संशोधन, ऊर्जा निर्मिती, स्वयंचलित यंत्रणा स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग किंवा वैद्यकीय उपकरणे - यंत्र अभियंते सर्वत्र आपली छाप पाडत आहेत. ए आय रोबोटिक्स, मॅचे टॉनिक्स आणि क्टीव्ह ◀◀ पान २ वर




## अंबाजोगाई नगरपरिषदेच्या ७५ लाखांच्या वसुंधरा बक्षीस निधीच्या वितरणाला प्रशासकीय मान्यता

### आ. नमिता मुंदडा यांचा पाठपुरावा फलदायी; शहरातील पर्यावरणपूरक प्रकल्पांना मिळणार गती

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने 'माझी वसुंधरा अभियान ४.०' अंतर्गत अंबाजोगाई नगरपरिषदेच्या ७५ लाख रुपयांच्या बक्षीस निधीतून करण्यात येणाऱ्या विकासकामांना प्रशासकीय मान्यता दिली आहे. या बक्षीस निधीच्या वितरणासाठी आमदार नमिता मुंदडा यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता.

मंगळवार, दि. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी राज्य शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार, अंबाजोगाई नगरपरिषदेने सादर केलेल्या ७५ लाख रुपये किंमतीच्या सविस्तर प्रकल्प अहवालाला मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पाअंतर्गत शहरातील प्रमुख चौकांवर वृक्षारोपण, स्मशानभूमी परिसरात मियावाकी पद्धतीचे जंगल, योगेश्वरी उद्यान व नगरपरिषद इमारतीवर सौर ऊर्जा प्रणाली, तसेच ई-व्हेईकल चार्जिंग स्टेशन आणि एलईडी स्ट्रीटलाईट बसविण्याची कामे हाती घेतली जाणार आहेत.

नगरपरिषदेला मिळालेल्या एकूण ७५ लाख रुपयांच्या बक्षीस निधीपैकी ३७ लाख ५० हजार रुपयांचा दुसरा हप्ता मंजूर करण्यात आला आहे. या निधीचे वितरण पर्यावरण विभागांतर्गत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्फत करण्यात येणार आहे.

'माझी वसुंधरा अभियान'च्या राज्यस्तरीय स्पर्धेत ५० हजार ते १ लाख लोकसंख्येच्या गटात अंबाजोगाई नगरपरिषदेला प्रथम क्रमांक मिळाला होता. या मान्यतेमुळे शहरात पर्यावरणपूरक प्रकल्पांना गती मिळणार असून, नागरिकांना स्वच्छ आणि हरित वातावरण लाभेल. हा निधी वितरित केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी शासनाचे दोन महत्त्वाचे निर्णय

### सिंचन विहिरी दुरुस्तीसाठी मदत, नापीक जमिनी मनरेगातून लागवडीयोग्य करता येणार-विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांचे तातडीने अंमलबजावणीचे निर्देश

छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने सन २०२५ च्या खरीप हंगामात अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी दोन महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. या निर्णयांमुळे सिंचन विहिरींच्या दुरुस्तीसाठी आर्थिक सहाय्य मिळणार असून, पूरामुळे नापीक झालेल्या शेतजमिनी मनरेगा योजनेतून पुन्हा लागवडीयोग्य करण्यात येणार आहेत. विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी या दोन्ही योजनांची तातडीने अंमलबजावणी करण्याचे निर्देश विभागातील जिल्हाधिकारी आणि गटविकास अधिकाऱ्यांना दिले आहेत.

सिंचन विहिरींच्या दुरुस्तीसाठी अर्थसहाय्य

खचलेल्या किंवा बुजलेल्या सिंचन विहिरींच्या दुरुस्तीसाठी शासनाने कमाल रु. ३०,०००/- इतकी मदत मंजूर केली आहे. प्रत्यक्ष दुरुस्तीचा खर्च किंवा ही कमाल मर्यादा यांपैकी जी रक्कम कमी असेल, ती शेतकऱ्याला देण्यात येईल. पात्रतेनुसार ज्या विहिरींचे पंचनामे झाले आहेत त्यांची दुरुस्ती या योजनेत अनुज्ञेय राहील. शेतकऱ्यांनी विहिरीची नोंद असलेला सातबारा जोडून गटविकास अधिकाऱ्यांकडे अर्ज करणे आवश्यक आहे.

जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून अंदाजपत्रकीय खर्चाच्या ५० टक्के रक्कम (कमाल रु. १५,०००/-) आगाऊ स्वरूपात मिळेल. उर्वरित रक्कम काम पूर्ण झाल्यावर वितरीत करण्यात येईल. दुरुस्तीनंतर सर्व विहिरींचे जिओ टॅगिंग करणे अनिवार्य आहे.

नापीक जमिनी लागवडीयोग्य करण्यासाठी मनरेगा योजनेचा वापर

पूरस्थितीमुळे खरडून नापीक झालेल्या लहान व सीमांत शेतकऱ्यांच्या (कमाल २ हेक्टर) शेतजमिनींची दुरुस्ती मनरेगा अंतर्गत केली जाणार आहे. जॉबकार्ड धारक शेतकरी या वैयक्तिक लाभाच्या कामांसाठी पात्र असतील. प्रत्येक हेक्टरसाठी कमाल रु. ३ लाख, तर २ हेक्टरपर्यंत एकूण रु. ५ लाख इतकी मदत मिळेल. या कामांसाठी मजुरी व सामग्रीवरील खर्चाचे ◀◀ पान २ वर

## आदित्य एज्युकेशन ग्रुपमध्ये अल्ट्राटेक स्किल होनिंग कार्यशाळा उत्साहात

**बीड | प्रतिनिधी**

आदित्य एज्युकेशन ग्रुपच्या सिव्हिल इंजनिअरिंग विभागात अल्ट्राटेक सिमेंट कंपनीच्या () तर्फे आयोजित कौशल्यविकास कार्यशाळा अत्यंत उत्साहात पार पडली. या कार्यशाळेत उपयुक्त प्रात्यक्षिकांसह १४५ विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही करण्यात आले. विद्यार्थ्यांचे व्यावहारिक ज्ञान वृद्धिंगत करून त्यांना पदवी पश्चात येणाऱ्या औद्योगिक आव्हानांना सक्षमपणे सामोरे जाण्यास तयार करण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.



९ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता झालेल्या या कार्यशाळेचे उद्घाटन शाम पैठणकर यांच्या प्रमुख उपस्थितीत, प्राचार्य डॉ. निलेश भास्कर बहादुरे, प्रा. सय्यद दायमी, प्रा. रवी कांबळे आणि प्रा. शरद कावळे यांच्या हस्ते करण्यात आले. कौशल्यविकास या विषयावर भर देत विद्यार्थ्यांना सिव्हिल इंजनिअरिंग क्षेत्रातील नव्या तंत्रज्ञानाची माहिती, कामातील व्यावहारिक अडचणी आणि त्यावरील उपाय यांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. या कार्यशाळेत एकूण १४५ विद्यार्थी सहभागी झाले.

प्रमुख पाहुणे शाम पैठणकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले, सिव्हिल इंजनिअरिंग हे केवळ बांधकामापुरते मर्यादित नसून नव्या तंत्रज्ञानाशी समन्वय साधणारे विज्ञान आहे. योग्य कौशल्य आणि आत्मविश्वास असल्यास प्रत्येक विद्यार्थी उत्तम अभियंता बनू शकतो. त्यांनी आदित्य एज्युकेशन ग्रुपचे संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या प्रेरणादायी नेतृत्वाचे आणि विद्यार्थ्यांसाठी घेतल्या जाणाऱ्या उपक्रमांचे ◀◀ पान २ वर

## पवन थिगळे यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार

बीड | प्रतिनिधी

येथील सेवानिवृत्त कर्मचारी दिलिपराव ( दामु) थिगळे यांचे चिरंजीव पवनकुमार थिगळे यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले त्याचा अत्यंसंस्कार आज दि. १४ अक्टोबंर मंगळवार रोजी सकाळी आठ वाजता अंकुशनगर स्मशान भुमी मध्ये करण्यात आला,यावेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते



पवन थिगळे वय ३८ वर्ष हे गेल्या दोन वर्षापासून आजारी होते १५ दिवसांपूर्वीच त्यांच्यावर मुंबई येथील खासगी रुग्णालयात किडनी ट्रान्सप्लांट शस्त्रक्रिया करण्यात आली होती,त्यांच्या पत्नीने स्वतःची किडनी देऊन त्यांना जीवदान दिले होते मात्र दि १३ रोजी सकाळी अचानक त्यांचे निधन झाले,त्यांच्या पश्चात आई,वडील,पत्नी,दोन मुलं,दोन भाऊ, भावजय,पुतण्या असा मोठा परिवार आहे,आज दि १४ रोजी अंकुश नगर येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले, यावेळी नातेवाईकांसह शहरातील लोकप्रतिनिधी, प्रतिष्ठीत नागरिक,मित्र परिवार उपस्थित होते,पोलीस खात्यातील पंकज थिगळे यांचे ते लहान बंधू होत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागातर्फे मॉक ड्रिल

## सांडपाणी शुद्धीकरण केंद्रात गॅस लिकेज आणि बचावकार्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक; कर्मचारी आणि नागरिकांना आपत्कालीन तयारीचे मार्गदर्शन





**पिंपरी । प्रतिनिधी**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या चऱ्होली उपअग्निशमन केंद्रामार्फत सांडपाणी शुद्धीकरण केंद्र (सिव्हेज ट्रीटमेंट प्लांट) येथे गॅस लिकेज, स्वतःचा आणि इतरांचा बचाव, आग आणि आगीचे प्रकार तसेच आग विझविण्याच्या पद्धतींवर आधारित मॉक ड्रिलचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी उपस्थित कर्मचारी व नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत काय करावे आणि काय करू नये, याबाबत मार्गदर्शन केले.**

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे यांच्या अधिपत्याखाली उपअग्निशमन अधिकारी ऋषिकांत चिपाडे आणि प्रभारी उपअग्निशमन अधिकारी विकास नाईक यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या मॉक ड्रिलमध्ये अग्निशमन विभागाचे जवान, सांडपाणी शुद्धीकरण केंद्राचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक सहभागी झाले होते.गॅस लिकेज झाल्यास काय उपाययोजना कराव्यात, परिसर तात्काळ रिकामा करण्याचे महत्त्व, अग्निशमन साधनांचा वापर करून आग लागल्यास तात्काळ नियंत्रणात आणण्यासाठी काय करावे, तसेच स्वतःचा आणि इतरांचा जीवितहानीपासून बचाव कसा करावा, याबाबत सविस्तर माहिती यावेळी देण्यात आली. अग्निशमन दलातील जवानांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे गॅस लिकेज ओळखण्याची चिन्हे, लहान व मोठ्या आगींचे प्रकार आणि विविध अग्निशामक उपकरणांचा योग्य वापर कसा करावा, हे दाखवून दिले.

तसेच सांडपाणी शुद्धीकरण केंद्रामध्ये कोणीही व्यक्ती किंवा प्राणी पडल्यास, त्या ठिकाणी असलेल्या विषारी वायूंपासून स्वतःचे आणि केंद्रामध्ये अडकलेल्या व्यक्ती अथवा प्राण्याचे रक्षण करून प्राथमिक स्तरावर बचावकार्य कसे करावे, याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या प्रशिक्षणात अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी सांडपाणी शुद्धीकरण केंद्रामधील बचावकार्य करताना पीपीई साधनांचा वापर, विषारी वायू ओळखण्यासाठी गॅस डिटेक्टर, हवेची गुणवत्ता तपासणी, सुरक्षित प्रवेश व निर्गमन तसेच आपत्कालीन तयारी याबाबत सविस्तर माहिती दिली.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विविध विभागांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांचे प्राणरक्षण आणि सुरक्षा ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. अशा मॉक ड्रिलमुळे पिंपरी चिंचवड महापालिकेचा अग्निशमन विभाग अशा उपक्रमांद्वारे नागरिक आणि कर्मचाऱ्यांमध्ये सुरक्षा संस्कार रुजवण्याचे कार्य करत आहे.
– प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

गॅस लिकेज किंवा आग यांसारख्या आपत्कालीन घटना क्षणात घडतात. अशा वेळी तत्काळ निर्णय घेणे आणि योग्य कृती करणे हाच जीव वाचवण्याचा मार्ग असतो. मॉक ड्रिलद्वारे नागरिक आणि संस्थांना प्रत्यक्ष सराव करून सज्ज ठेवणे हे आमचे उद्दिष्ट आहे.
– उमेश ढाकणे, सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

औद्योगिक परिसरात गॅस लिकेज किंवा सांडपाणी शुद्धीकरण केंद्रातील आपत्कालीन घटना गंभीर परिणाम करू शकतात. त्यामुळे अशा ठिकाणी काम करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याला सुरक्षेचे मूलभूत प्रशिक्षण मिळणे अत्यावश्यक आहे. या मॉक ड्रिलमुळे केंद्रामधील कर्मचार्यांचा आत्मविश्वास वाढला आहे.
– विकास नाईक, उपअग्निशमन अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका


## लाच स्विकारताना पोलीस शिपाई, निवृत्त अधिकाऱ्याला रंगेहात पकडले; अँटी करप्शन ब्युरोची कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

कोंढवा पोलीस ठाण्यातील एका पोलीस शिपायाला तसेच एका सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्याला लाच प्रकरणी अँटी करप्शन ब्युरो (–उइ) पुणे यांनी रंगेहात पकडले आहे. ही कारवाई आज (दि. १३ ऑक्टोबर) कोंढवा पोलीस स्टेशन समोर करण्यात आली.

तक्रारदाराविरुद्ध दाखल वीज चोरीच्या गुन्ह्यात मदत करण्यासाठी तसेच अटक न करण्याच्या मोबदल्यात १०,००० रुपयांची लाच मागणी करण्यात आली होती. अखेर तडजोडीअंती ५,००० रुपये स्वीकारताना आरोपी रंगेहात पकडला गेला.

एसीबीकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी पोलीस शिपाई सोमनाथ बापू महारनवर (३४), कोंढवा पोलीस स्टेशन येथे कार्यरत असून, त्याला



मदतीसाठी सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक युवराज कृष्णा फरांदे (५९) यांनी प्रोत्साहन दिले होते.

तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने १० व ११ ऑक्टोबर रोजी पडताळणी करण्यात आली होती. त्यानंतर १३ ऑक्टोबर रोजी अँटी करप्शन ब्युरोच्या पथकाने सापळा रचून लाच स्वीकारतानाच आरोपीला पकडले.ही कारवाई सहाय्यक पोलीस आयुक्त निता मिसाळ यांच्या नेतृत्वाखाली, पोलीस निरीक्षक असावरी शेडगे यांच्या पथकाने केली.संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर पोलीस अधीक्षक अजीत पाटील व अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## शिरूर–जुन्नर परिसरात बिबट्याच्या हल्ल्यांनी हादरली जनता; खासदार कोल्हेंनी घेतली दखल

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर तालुका आणि जुन्नर परिसरात गेल्या दहा दिवसांत बिबट्याच्या हल्ल्यांमुळे दोन निरागस चिमुकल्यांचा मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण पसरले आहे. शिरूर तालुक्यातील पिंपरखेड येथे पाच वर्षीय शिवन्या बोंबे हिचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला, तर काही दिवसांपूर्वी जुन्नर तालुक्यातील कुमशेत येथेही असाच दुर्दैवी प्रसंग घडला, ज्यामध्ये आणखी एका मुलाचा बळी गेला. या घटनांमुळे स्थानिक ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

या गंभीर परिस्थितीची दखल घेत शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.



अमोल कोल्हे यांनी पिंपरखेड येथे भेट देऊन मयत शिवन्या बोंबेच्या कुटुंबियांचे सांत्वन केले. यावेळी त्यांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करत तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. ते म्हणाले, दहा दिवसांत दोन निरागस मुलांचा जीव गेला, ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी मी वारंवार पत्रव्यवहार करत आहे, परंतु मुख्यमंत्री यांना कृती आराखड्यासाठी वेळ नाही. कबुतरांसाठी वेळ असणाऱ्या मुख्यमंत्र्यांना आमच्या लेकरांसाठी वेळ नाही, हे खेदजनक आहे.

यावेळी सहाय्यक वनसंरक्षक स्मिता राजहंस आणि वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांनी खासदार कोल्हे यांना घटनेची माहिती दिली. स्मिता राजहंस यांनी पिंजऱ्यांची कमतरता असल्याने अडचणी येत असल्याचे सांगितले. यावर कोल्हे यांनी तीव्र शब्दांत प्रतिक्रिया देत म्हटले, एका चिमुकल्याचा जीव जाणे ही फार मोठी हानी आहे. ही भरपाई होऊ शकत नाही. लवकरच पालकमंत्र्यांसोबत मीटिंग आहे, त्यात मी स्वतः उपस्थित राहणार आहे. तुम्ही निर्भीडपणे उपाययोजनांसाठी आवश्यक बाबी मांडा.पिंपरखेड येथील ग्रामस्थांनी वनविभागाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. आमचा जीव महत्त्वाचा की बिबट्याचा? आमच्या लेकरांचे संरक्षण प्राधान्याने व्हायला हवे, अशी संतप्त भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. या पार्श्वभूमीवर, बेल्हे–जेजुरी राज्य मार्गावर येत्या गुरुवारी (दि. १६ ऑक्टोबर) मोठ्या जनआंदोलनाची हाक प्रफुल्ल बोंबे यांनी दिली. या आंदोलनाच्या इशाऱ्यावेळी खासदार अमोल कोल्हे, सहाय्यक वनसंरक्षक स्मिता राजहंस, वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे आणि मंचर बाजार समितीचे माजी सभापती देवदत्त निकम उपस्थित होते.

परिसरात भीतीचे वातावरण

या घटनांमुळे शिरूर आणि जुन्नर परिसरातील गावकऱ्यांमध्ये भीती आणि असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर दुःख आणि राग स्पष्ट दिसत आहे. बिबट्याच्या हल्ल्यांमुळे निर्माण झालेल्या या संकटावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी जोर धरत आहे. आगामी जनआंदोलनातून ग्रामस्थ आपला आवाज बुलंद करणार असून, वनविभाग आणि प्रशासनाकडून ठोस पावले उचलली जावीत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.




## लाच देऊ नका, लाच घेऊ नका, लाचलुचपत विरोधी ब्युरोची जनजागृती मोहीम

शिरूर : सरकारी नोकर किंवा लोकप्रतिनिधी यांनी कोणत्याही कामासाठी लाचेची मागणी केल्यास नागरिकांनी तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांनी केले आहे.

या जनजागृती मोहिमेअंतर्गत अॅन्टी करप्शन ब्युरोच्या अधिकाऱ्यांनी शिरूर तहसील कार्यालय, भुमिअभिलेख विभाग तसेच पंचायत समिती येथे भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला. लाचलुचपतविरोधी कायद्याबाबत माहिती देत भ्रष्टाचारमुक्त प्रशासन हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. प्रविण निबांळकर या अधिकाऱ्यांनी सांगितले की, कोणीही सरकारी अधिकारी किंवा कर्मचारी यांनी लाचेची मागणी केल्यास नागरिकांनी भीती न बाळगता थेट अॅन्टी करप्शन ब्युरोशी संपर्क साधावा. तक्रारदाराची ओळख गुप्त ठेवली जाईल आणि कायदेशीर कारवाई तत्काळ करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या उपक्रमाद्वारे अॅन्टी करप्शन ब्युरोने नागरिकांमध्ये भ्रष्टाचाराविरुद्ध सजगता निर्माण करण्याचा प्रयत्न केला असून, लाच देणारा आणि लाच घेणारा दोघेही गुन्हेगार हा संदेश सर्वत्र पोहोचविण्यात आला आहे.

## माजी महापौर बाळासाहेब शिरोळे यांचे निधन; वयाच्या ९२ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहरातून एक दुःखद बातमी समोर आली आहे. पुण्याचे माजी महापौर बाळासाहेब शिरोळे यांचे निधन झाले असून, त्यांनी ९२ वर्षी अखरेचा श्वास घेतला. आज दुपारी पाच वाजता त्यांच्यावर वैंकुठ स्मशानभूमी येथे अत्यंसंस्कार करण्यात येणार आहे.



आज सकाळी बाळासाहेब शिरोळे यांची १०.५० वाजता खाजगी दवाखान्यात प्राणज्योत मालवली. माजी महापौर, माजी आमदार भाऊसाहेब लक्ष्मणराव शिरोळे यांचे ते धाकटे बंधु होते. १९७४ व १९७९ साली सलग दोन वेळा पुणे महानगरपालिकेमध्ये नगरसेवक म्हणून ते निवडून आले होते.प्रथम वाहन व्यवहार समितीचे अध्यक्ष नंतर १९८३–८४ मध्ये पुणे शहराचे महापौर म्हणून त्यांनी कार्य केले. रोज सकाळी पायी चालण्याचा व्यायाम करण्याचा अनेक वर्षाचा त्यांचा परिपाठ होता. निधनानंतर त्यांच्या पाश्चात दोन मुले, सुना, दोन, मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांसाठी चितळे डेअरीकडून पुढाकार; मुख्यमंत्री सहायता निधीस एक कोटी रुपयांचे योगदान



पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्रात काही भागांत यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात पशुधन व शेत–शिवाराच्या झालेल्या नुकसानातून आपत्तीग्रस्त शेतकरी व नागरिकांना पुन्हा उभे करण्यासाठी चितळे डेअरीने पुढाकार घेतला असून, मुख्यमंत्री सहाय्यता निधीस एक कोटी रुपयांचे योगदान दिले आहे. मुंबईत माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मदतीचा धनादेश चितळे डेअरीतर्फे सीनियर मॅनेजिंग पार्टनर श्रीपाद चितळे, विश्वास चितळे व मॅनेजिंग पार्टनर निखिल चितळे यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला.

चितळे डेअरी गेल्या ८६ वर्षांपासून दुग्धव्यवसायासोबतच समाजकार्यातही सातत्याने अग्रस्थानी राहिली आहे. कोविडसारख्या जागतिक महामारी; तसेच पूरसारख्या स्थानिक आपत्तींमध्येही संस्थेने शेतकरी बांधवांसोबत कायम खंबीरपणे उभे राहून मदतीचा हात दिला आहे.शेतकरी हा आपल्या देशाचा कणा आहे. या वर्षी राज्याच्या काही भागात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी आणि पुनर्बांधणीसाठी हातभार लावणे ही आमची जबाबदारी आहे, असे चितळे डेअरीचे मॅनेजिंग पार्टनर निखिल चितळे यांनी सांगितले.

## ‘साहेब पैसे नको, आमचं बाळ परत द्या’, शिवन्याच्या आई–वडिलांचा हृदय पिळवटून टाकणारा हंबरडा

जांबुत । प्रतिनिधी

साहेब पैसे नको आम्हाला, या पैशाचं आम्ही काय करू..आमचं बाळ आम्हाला परत द्या म्हणत शिवन्याच्या आई–वडिलांनी वन अधिकारी यांच्या समोर हंबरडा फोडला. पिंपरखेड येथे बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या शिवन्याच्या कुटुंबियांना वनविभागाकडून तत्काळ दहा लक्ष रुपयांचे सानुग्रह अनुदानाचा धनादेश आई वडीलांकडे सुपूर्द करताना उपवनसंरक्षक व सहाय्यक वनसंरक्षकासह उपस्थित सर्वांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्याचे पहायला मिळाले.



पिंपरखेड येथील बिबट्याच्या हल्ल्याच्या घटनास्थळी जुन्नर उपवनसंरक्षक प्रशांत खाडे व सहाय्यक वनसंरक्षक स्मिता राजहंस यांनी, वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांनी भेट देऊन नागरिकांच्या समस्या जाणून बिबट मुक्त होण्यासाठी उपाययोजना याबाबत चर्चा केली. ग्रामस्थांनी बिबट मुक्त करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी यावेळी उपवनसंरक्षक यांच्याकडे केली.

या भागातील ग्रामपंचायतचे ठराव वरिष्ठ स्तरावर देऊन बिबटमुक्त परिसर करण्यासाठी सर्व प्रयत्न करण्यात येईल असे आश्वासन उपस्थित ग्रामस्थांना देत संबंधित अधिकारी व क्षेत्रीय कर्मचारी यांना उपवनसंरक्षक प्रशांत खाडे यांनी सुचना केल्या. तसेच घटनास्थळी लावलेल्या पिंजऱ्याची पाहाणी केली.पिंपरखेड घटनास्थळी एक बिबट जेरबंद झाला असला तरी जोपर्यंत या परिसरातील लोकांना शांततेत रहाता येत नाही आणि हा परिसर बिबट मुक्त होत नाही, तोपर्यंत बिबट जेरबंद करण्याची कार्यवाही अशीच सुरू राहिल असे निर्देश वाईल्ड लाईफ व क्षेत्रीय कर्मचारी यांना देण्यात आल्याचे जुन्नरचे उपवनसंरक्षक खाडे यांनी सांगितले. यावेळी पिंपरखेड गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

## चित्रकला, आणि नाटिकांमधून विद्यार्थ्यांनी मानसिक आरोग्याचे महत्त्व केले अधोरेखित!





पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या उर्दू प्राथमिक शाळा, कासारवाडी येथे जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील मार्गदर्शनाखाली शिक्षण विभागाचे सहायक आयुक्त किरणकुमार मोरे यांच्या अधिपत्याखाली विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात इयत्ता पाचवी ते आठवीतील एकूण ८९ विद्यार्थी सहभागी झाले, तर ३० विद्यार्थ्यांनी चित्रकला स्पर्धेत उत्साहाने भाग घेतला होता.

शाळेच्या मुख्याध्यापिका एस.एस. कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत मानसिक आरोग्याचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले. शाळेच्या समुपदेशक ऋतिका बेलदार यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून तणावमुक्त राहण्याचे उपाय, आत्मविश्वास वाढविण्याचे मार्ग आणि सकारात्मक विचारसरणी अंगीकारण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

कार्यक्रमानंतर मानसिक आरोग्याचे महत्त्व या विषयावर चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी रंगांच्या माध्यमातून मानसिक आरोग्याचे संदेश प्रभावीपणे व्यक्त केले. तसेच विद्यार्थ्यांनी घोषवाक्ये, कविता आणि लघुनाटिका सादर करून कार्यक्रमाला अधिक रंगत आणली. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना योग व ध्यानाचा सराव, तसेच अडचणींच्या वेळी विश्वासू व्यक्तींशी संवाद साधण्याचा सल्ला देण्यात आला. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी माहितीपूर्ण, प्रेरणादायी आणि सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरला, असे मत शिक्षक व पालकांनी व्यक्त केले.